
माता कालरात्रि

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, १७ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३०८ | किंमत : २ रूपये



Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075



सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


# इथेनॉलमध्ये साखरेच्या वापरावर बंदी

## साखरेच्या वाढत्या किंमतीमुळे सरकारने घेतला मोठा निर्णय

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
सणासुदीचा हंगाम सुरु होण्यापूर्वीच, साखरेच्या दरात मोठी वाढ झाल्याचंचित्र पाहायला मिळत आहे. यामुळं ग्राहकांमध्ये चिंता निर्माण झाली होती. परिणामी, साखरेच्या उपलब्धतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर, साखरेची टंचाई आणि किमतींमधील अस्थिरता टाळण्यासाठी सरकारने आता एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारने इथेनॉल उत्पादनात साखरेच्या वापरावर पूर्णपणे बंदी घातली आहे.

**साखरेचा वापर करून इथेनॉल उत्पादनासाठीच्या परवानग्या केल्या बंद**

२०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी जारी केलेल्या नवीन निविदेमध्ये, साखरेचा वापर करून इथेनॉल उत्पादनासाठीच्या परवानग्या बंद केल्या आहेत. याचा अर्थ, इथेनॉल उत्पादनासाठी उसाचा रस, साखरेचा पाक आणि बी-हेवी मळीचा वापर केला जाणार नाही. इथेनॉल तयार करण्यासाठी उसाच्या रसातून किंवा साखरेतून संपूर्ण मळी काढली जाते, तेव्हा साखरेच्या उत्पादनाचे प्रमाण कमी होऊ शकते. त्यामुळे, देशात साखरेची टंचाई निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळं सरकारनं खाखरेचा वापर करुन इथेनॉलची निर्मिती न करण्याचा निर्णय घेतला आहे.

**सरकारने हा निर्णय का घेतला?**

अधिक उसापासून साखरेचे उत्पादन करणे आणि देशांतर्गत बाजारात तिची उपलब्धता कायम राखणे, हा सरकारचा उद्देश आहे. देशातील साखर उत्पादनाबाबत चिंता वाढत होती. महाराष्ट्र आणि कर्नाटक या प्रमुख ऊस उत्पादक राज्यांमध्ये, कमी पाऊस आणि प्रतिकूल हवामानामुळे यावर्षी उत्पादनावर लक्षणीय परिणाम झाला आहे. मागील हंगामातही सुरुवातीला उत्पादन कमी होते. अशा परिस्थितीत, देशात साखरेची टंचाई टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. इथेनॉल उत्पादनामुळे साखरेच्या उत्पादनाचे प्रमाण कमी होईल. जेव्हा इथेनॉल तयार करण्यासाठी उसाच्या रसातून किंवा साखरेतून संपूर्ण मळी काढली जाते, तेव्हा साखरेच्या उत्पादनाचे प्रमाण कमी होऊ शकते. त्यामुळे, देशात साखरेची टंचाई टाळण्यासाठी उपलब्ध उसाचा अधिक वापर साखर उत्पादनासाठी व्हावा, हे सरकारला सुनिश्चित करायचे आहे.

**इथेनॉल उत्पादन कसे होणार?**

साखरेपासून इथेनॉल उत्पादनावरील बंदीनंतर, सरकार इतर पयार्यांवर लक्ष केंद्रित करत आहे. यामध्ये मका, पोहे आणि अतिरिक्त तांदूळ यांसारख्या धान्यांचा समावेश आहे. तेल कंपन्यांनी पर्यायी स्रोतांकडून अंदाजे ११ अब्ज लिटर इथेनॉल खरेदी करण्यासाठी नवीन निविदा मागवल्या आहेत. मक्यापासून उत्पादित इथेनॉलसाठीचे प्रोत्साहनही कमी करण्यात आले आहे. सरकार अनेक दिवसांपासून या विषयावर चर्चा करत आहे. काळजीपूर्वक विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. आता येत्या काळात या निर्णयाचा परिणाम साखरेच्या किमतींवरही दिसून येईल.




थोडक्यात

## अर्धवट विसर्जित दुर्गामूर्तींचे फोटो काढण्यावर बंदी

**मुंबई :** दुर्गा विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी एक अत्यंत महत्त्वाचा आदेश जारी केला आहे. २० ते २२ ऑक्टोबर दरम्यान दुर्गा विसर्जनाच्या वेळी पाण्यात तरंगणाऱ्या किंवा अर्धवट विसर्जित झालेल्या (बुडालेल्या) दुर्गामूर्तींचे फोटो किंवा व्हीडीओ काढण्यास आणि व्हायरल करणाऱ्यांवर बंदी घालण्यात आली आहे. मुंबईचे पोलिस उपायुक्त अकबर पठाण यांनी नव्याने लागू झालेल्या भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत हा आदेश जारी केला आहे. नागरिकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जाऊ नयेत आणि शहरात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. पोलिसांनी जारी केलेल्या आदेशानुसार, २० ते २२ ऑक्टोबर या कालावधीत मुंबई शहरातील विविध तलाव, समुद्रकिनारे आणि जलाशयांमध्ये देवी दुर्गेच्या मूर्तींचे विसर्जन केले जाईल. या प्रक्रियेदरम्यान, समुद्रातील भरती-ओहोटीमुळे किंवा तलावाच्या पाण्यावर तरंगत काही अर्धवट विरघळलेल्या मूर्ती पुन्हा किनाऱ्यावर येण्याची शक्यता असते. अशा वेळी बीएमसीचे कर्मचारी या मूर्ती पाण्याबाहेर काढण्याचे काम करतात.
पोलिसांनी स्पष्ट केले आहे की, अशा अर्धवट विसर्जित मूर्तींचे फोटो किंवा व्हीडीओ काढणे, ते सोशल मीडियावर व्हायरल करणे किंवा बीएमसी कर्मचाऱ्यांनी त्या मूर्ती बाहेर काढतानाचे दृश्य शेअर केल्यास भाविकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जाऊ शकतात. यातून सार्वजनिक शांतता आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

# विजय खैरनारला फाशीची शिक्षा

**वृत्तसंस्था, नाशिक**
नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथे संपूर्ण महाराष्ट्राला सुन्न करणाऱ्या साडेचार वर्षांच्या चिमुकलीवरील अत्याचार आणि निर्घृण हत्या प्रकरणात न्यायालयाने निकाल दिला आहे. या प्रकरणातील दोषी आरोपी विजय खैरनार याला न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली आहे.
डोंगराळे शिवारात अवघ्या साडेचार वर्षांच्या निरागस बालिकेचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार केले होते. यानंतर आरोपीने तिची हत्या केली. या धक्कादायक घटनेने संपूर्ण राज्यभरात संतापाची लाट उसळली होती. आरोपीला कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी सुरू होती.
या चिमुकलीची हत्या १७ नोव्हेंबर २०२५ रोजी झाली होती. डोंगराळे या गावातील चार वर्षांच्या मुलीला आरोपी विजय खैरनार याने चॉकलेट देण्याचे आमिष दिले. चॉकलेट देऊन



त्याने च्या चिमुकलीचे अपहरण केले. तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. यानंतर तिची हत्या केली. आरोपीने या चिमुकलीचा मृतदेह एका मोबाईल टॉवर जवळ टाकून दिला. चिमुकली घरी न आल्यामुळे कुटुंबीयांनी तपास सुरू केला. काही वेळानंतर मुलीचा मृतदेह सापडला. ही घटना उघडकीस आल्यानंतर राज्यात संतापाची लाट पसरली होती. या घटनेचा पोलिसांनी तपास केला, आरोपी विजय खैरनार याला अटक केली.
राज्य शासनाने या खटल्यात सरकारी पक्षाच्या बाजूने लढण्यासाठी ज्येष्ठ विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांची नियुक्ती केली होती. सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाने २४ साक्षीदारांचे जबाब नोंदवून आरोपीविरोधातील पुरावे न्यायालयापुढे मांडले. या पुराव्यांच्या आधारे मालेगावच्या अपर जिल्हा व सत्र न्यायालयाने १ ऑक्टोबर २०२६ रोजी विजय खैरनारला दोषी ठरवले होते. तर आज, १६ ऑक्टोबर रोजी न्यायालयाने त्याला फाशीची शिक्षा सुनावली.
जनतेचा तीव्र आक्रोश आणि प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य सरकारने ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली होती. त्यांनी न्यायालयात सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निवाड्यांचे दाखले देत सुमारे ५० मिनिटे टोकदार युक्तिवाद केला. डोंगराळे गावातील लहान मुले आरोपी विजय खैरनार याला दादा म्हणून संबोधत असत. खेळणाऱ्या लहान मुलांमध्ये पीडिता ही एकुलती एक निष्पाप मुलगी होती.

# लालकृष्ण अडवाणी रुग्णालयात दाखल, छातीच्या संसर्गाचा त्रास, उपचार सुरु

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. छातीच्या संसगार्चा त्रास झाल्याने लालकृष्ण अडवाणी यांना दिल्लीतील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ९८ वर्षीय अडवाणी यांना शुक्रवारी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर फुफ्फुस विभागात उपचार सुरु आहेत.
भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांना छातीत संसर्ग झाल्याची तक्रार केल्यानंतर दिल्लीतील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



**एका आठवड्यापूर्वी पंतप्रधान मोदींनी घेतली होती भेट**

ज्येष्ठ नेते अडवाणी यांना रुग्णालयात दाखल करण्याच्या सुमारे आठवडाभर आधी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ७ ऑक्टोबर रोजी नवी दिल्लीतील त्यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान, सरकार प्रमुख म्हणून २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल मोदींनी अडवाणींचे आशीर्वाद घेतले. पंतप्रधान मोदी यांनी ७ ऑक्टोबर २००१ रोजी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून सरकारची सूत्रे स्वीकारली. त्यानंतर त्यांनी तीन वेळा गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले.
पुढे ते पंतप्रधान झाले आणि त्यांनी सलग तीन लोकसभा निवडणुका जिंकल्या. माजी उपपंतप्रधान एल. के. अडवाणी यांच्या भेटीनंतर पंतप्रधान मोदींनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली. त्यांनी म्हटले की, अडवाणींची दशकांची सार्वजनिक सेवा आणि राष्ट्रजीवनातील त्यांच्या योगदानाने खोलवर ठसा उमटवला आहे. देशाची प्रगती अधिक मजबूत करण्यात अडवाणींच्या महत्त्वपूर्ण भूमिकेचीही मोदींनी नोंद घेतली.

**लालकृष्ण अडवाणी भाजपचे तीन वेळा राष्ट्रीय अध्यक्ष**

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून तीन वेळा काम पाहिले. त्यांचा पहिला कार्यकाळ १९८६ ते १९९० दुसरा १९९३ ते १९९८ आणि तिसरा २००४ ते २००५ असा होता. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचा मतदारवर्ग झपाट्याने विस्तारला.
१९८४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने केवळ दोन जागा जिंकल्या, तर १९८९ मध्ये ८५ जागा जिंकल्या. १९९६ मध्ये भाजप लोकसभेतील सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला.
अडवाणी यांनी अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकारमध्ये १९९८ ते २००४ पर्यंत केंद्रीय गृहमंत्री आणि २००२ ते २००४ पर्यंत उपपंतप्रधान म्हणून काम पाहिले. त्यांनी लोकसभेत विरोधी पक्षनेते म्हणूनही काम पाहिले.

# सरन्यायाधीशांवरील टिप्पणीप्रकरणी राऊत यांना नोटीस

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी शिवसेना (यूबीटी) खासदार संजय राऊत यांच्याकडून सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्यावरील वक्तव्यांबाबत स्पष्टीकरण मागितले. निवडणूक आयोगाच्या कामकाजावर आणि एसआयआरच्या मुद्यावर इंडिया आघाडीच्या नेत्यांची भेट घेण्यास नकार दिल्याबद्दल राऊत यांनी सरन्यायाधीशांवर टीका केली होती. पत्रकार निखिल वागळे यांनाही नोटीस बजावण्यात आली आहे.
सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनने दाखल केलेल्या फौजदारी अवमान याचिकेवर ही कारवाई करण्यात आली. संस्थांवर होणारे हल्ले अत्यंत दुर्दैवी असल्याचे न्यायालयाने म्हटले. दोघांनाही त्यांच्याविरुद्ध अवमानाची कारवाई का करू नये, असा सवाल विचारण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने खासदार संजय राऊत आणि निखिल वागळे यांना पुढील सुनावणीला वैयक्तिकरित्या हजर राहण्यापासून सूट दिली आहे. खंडपीठ प्रथम त्यांच्या उत्तरांचा विचार करेल. सीजेआय सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर राहुल गांधी, संजय राऊत यांच्यासह इंडिया ब्लॉकच्या नेत्यांशी संबंधित याचिकेवर सुनावणी सुरू होती.
एससीबीएने १५ ऑक्टोबर रोजी याचिका दाखल करून आरोप केला की, वागळे यांनी त्यांच्या एक्स अकाउंटवर सीजेआय यांच्याविरोधात अपमानास्पद टिप्पणी केली होती.

# अमरावती शिक्षक मतदारसंघात महायुतीत वाद पेटला!



**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**
राज्यातील विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या पाच जागांवरून महायुतीमध्ये निर्माण झालेला अंतर्गत तणाव आणि बंडखोरीचे नाट्य आता टोकाला पोहोचले आहे. अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात महायुतीचे अधिकृत उमेदवार आणि शिवसेनेचे आमदार किरण सरनाईक यांच्या अडचणी वाढल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने अत्यंत सावध आणि मोठी राजकीय खेळी खेळली आहे.
अमरावती शिक्षक मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार गाजी मोहम्मद जाहेरोश यांचा उमेदवारी अर्ज छाननीत फेटाळला गेल्याने सध्या निवडणूक रिंगणात वंचितचा कोणताही उमेदवार उपलब्ध नाही. हीच संधी साधत शिंदेंच्या शिवसेनेने वंचितच्या मदतीसाठी थेट प्रकाश आंबेडकर यांच्याशी संपर्क साधला आहे. एकनाथ शिंदे यांचे विशेष दूत निलेश देशमुख यांनी मुंबईतील दादर येथील 'राजगृह' या प्रकाश आंबेडकर यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची प्रत्यक्ष भेट घेतली.
या भेटीदरम्यान वंचितचा उमेदवार रिंगणात नसल्याने शिवसेनेचे अधिकृत उमेदवार आमदार किरण सरनाईक यांना अमरावती शिक्षक मतदारसंघात पाठिंबा आणि मदत करण्याची विनंती आंबेडकरांना करण्यात आली. या महत्त्वपूर्ण भेटीनंतर निलेश देशमुख यांनी अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांचा दौरा करत 'डॅमेज कंट्रोल'चे प्रयत्न सुरू केले आहेत. त्यांनी अकोल्यात शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची आढावा बैठक घेतली.
या दौऱ्यादरम्यान देशमुख यांनी अकोल्यातील वंचितच्या एका नगरसेवकाची त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली. तसेच पातूर येथील माजी नगराध्यक्ष आणि शिक्षण संस्थाचालक सय्यद बुऱ्हाण नबी यांची भेट घेऊन अमरावती शिक्षक मतदारसंघाच्या पाठिंब्याबाबत आणि काही स्थानिक नेत्यांच्या पक्षप्रवेशाबाबत सकारात्मक चर्चा केल्याची माहिती समोर येत आहे.
अमरावती शिक्षक मतदारसंघात भाजप नेत्यांच्या जवळच्या नातेवाईकांनीच अधिकृत उमेदवाराविरोधात बंडखोरीचा झेंडा उभारल्याने महायुतीत तीव्र नाराजी पसरली आहे. तिवसा मतदारसंघातील भाजप आमदार राजेश वानखडे यांचे मेहुणे शेखर भोयर यांनी अपक्ष उमेदवारी कायम ठेवली आहे. तर भाजप खासदार अनिल बोंडे यांच्या भगिनी संगीता शिंदे यांनीही बंडखोरी करत उमेदवारी मागे घेण्यास नकार दिला आहे.

# दुष्काळाचे सावट गडद

**वृत्तसंस्था, पुणे/नवी दिल्ली**
नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी आता देशाचा निरोप घेतला. दक्षिणेकडील राज्यांतूनही माघार घेतल्याने यंदाचा नैऋत्य मोसमी पावसाचा हंगाम अधिकृतरीत्या संपुष्टात आला आहे. यंदा देशात सरासरीच्या तुलनेत १३ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे. यंदा १६ मे रोजी अंदमानात, तर ४ जून रोजी केरळमध्ये मोसमी पावसाचे आगमन झाले. ९ जुलैपर्यंत त्याने संपूर्ण देश व्यापला होता.
सुरुवातीपासूनच पावसाळ्यावर एल निनोचा प्रभाव राहिला. जून महिन्यात देशात सरासरीच्या केवळ ६५ टक्के पाऊस झाला. जुलैमध्ये १०१



टक्के पावसाची नोंद झाल्याने सरासरी भरून निघण्याची आशा निर्माण झाली होती. मात्र, ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये पावसाने पुन्हा ओढ दिली. ऑगस्टमध्ये सरासरीच्या ८४ टक्के, तर सप्टेंबरमध्ये ९२ टक्के पाऊस झाला. परिणामी, संपूर्ण हंगामात सरासरीच्या ८७ टक्के पावसाची नोंद झाली. राजस्थानच्या पश्चिम भागातून १९ सप्टेंबर रोजी मोसमी पावसाच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली होती. साधारण महिनाभराच्या प्रवासानंतर १५ ऑक्टोबर रोजी त्याने देशातून माघार घेतली. या काळात परतीचा पाऊस अपेक्षेप्रमाणे बरसला नाही. त्यामुळे पाणीसाठ्यांवरील ताण आणि आगामी काळातील पाणीटंचाईची चिंता वाढली आहे. कमी पावसाच्या पार्श्वभूमीवर संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी प्रशासनाकडून नियोजनाला सुरुवात झाली आहे.

**मार्च २०२७ पर्यंत एल निनोचा प्रभाव**

प्रशांत महासागरातील एल निनोच्या स्थितीचा आगामी हवामानावर परिणाम होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने गुरुवारी दिलेल्या माहितीनुसार, एल निनोचा प्रभाव डिसेंबरपर्यंत आणखी वाढू शकतो आणि मार्च २०२७ पर्यंत तो कायम राहण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम आगामी हिवाळ्याच्या हंगामावरही होऊ शकतो. त्यामुळे देशातील बहुतांश भागांत कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

**कडाक्याच्या थंडीसाठी प्रतीक्षा**

हवामान विभागाने पुढील दोन आठवड्यांचा अंदाज जाहीर केला आहे. त्यानुसार, राजस्थान वगळता देशाच्या बहुतांश भागांत कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे. एल निनोच्या प्रभावामुळे यंदाच्या हिवाळ्यात थंडीची तीव्रता कमी राहण्याची शक्यता असून कडाक्याच्या थंडीसाठी प्रतीक्षा करावी लागू शकते.

संपादकीय लेखणीतून...

## मदत @ ५०००

राज्यात ३०५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी ५ हजार रुपये अग्रीम मदत देण्याची घोषणा करून सरकारने शेतकऱ्यांच्या दुःखावर जणू काही मीठच चोळले आहे. शेतीचा उत्पादन खर्चही भरून न निघणारी मदत देऊन सरकार शेतकऱ्यांच्या दुःखाची चेष्टा करत आहे. एका बाजूला शेतकऱ्यांचे हक्काचे हप्ते थकीत आहेत दुसरे म्हणजे पिकांचे नुकसान, डोक्यावर कर्ज आणि कृषी सेवा केंद्राच्या उधारीचा तगादा होत असल्याने सरकारच्या घोषणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. पीक विम्याच्या संरक्षित रकमेइतकी नुकसानभरपाई द्यावी, नमो शेतकरी योजनेचे थकीत हप्ते आणि लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थ्यांची प्रलंबित रक्कम जमा करावी या मागणीने जोर धरला आहे. पिके उभी करण्यासाठी शेतकऱ्यांनी बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीवर मोठा खर्च केला आहे. आता पिकांचे नुकसान झाल्याने उत्पन्नाची आशा मावळली असून कृषी सेवा केंद्र दुकानदार उधारी वसूल करण्यासाठी तगादा लावत आहेत. अशा परिस्थितीत ५ हजार रुपयांच्या मदतीतून उत्पादन खर्चाची भरपाई होणे शक्य नाही. मग दिवाळी कशी साजरी करायची? ५ हजारात दिवाळी साजरी होते का? हा प्रश्न मुख्यमंत्र्यांनी आपल्या घरी विचारला असता तर त्यांना नेमके उत्तर मिळाले असते. आता अग्रीम मदतीच्या नावाखाली जाहीर केलेली रक्कमच अंतिम मदत ठरण्याची भीती आहे. खरे तर प्रत्यक्ष नुकसानीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना पुरेशी भरपाई द्यायला हवी होती.

दुष्काळ, कर्जमाफी, पीक विमा, वन हक्क, देवस्थान आणि गायरान जमिनींसह शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर अखिल भारतीय किसान सभेने राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे.२६ ऑक्टोबर रोजी राज्यातील हजारो शेतकरी वाहन मोर्चाने मुंबईकडे रवाना होणार आहेत. २७ ऑक्टोबरपासून आझाद मैदानावर महामुक्काम सत्याग्रह करण्यात येणार आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत देण्याऐवजी त्यांच्या नुकसानीची योग्य भरपाई सरकारने द्यायला हवी होती उलट थकीत हप्ते रोखून धरण्यात आले आहेत. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेतून वर्षाला ६ हजार रुपये तर नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेतून आणखी ६ हजार रुपये दिले जातात. २५ मार्च २०२६ रोजी नमो शेतकरी योजनेचा आठवा हप्ता ८९ लाख ७५ हजार २९८ शेतकरी कुटुंबाच्या खात्यात जमा करण्यात आला होता. त्या नंतरचे नववे आणि दहावे हप्ते रखडले. या दोन हप्त्यांपोटी पात्र शेतक-यांना प्रत्येकी ४ हजार रुपये मिळणे बाकी आहे. सरकारने थकीत रक्कम त्वरित भरणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचे हक्काचे पैसे थकवायचे आणि ५ हजारांची मदत जाहीर करून श्रेय लाटायचे हा कोणता न्याय? मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांची संख्या सुमारे २.४७ कोटींवरून १.६६ कोटींवर आली.

सुमारे ८१ लाख लाभार्थी कमी झाल्याच्या पार्श्वभूमीवर पात्र महिलांच्या प्रलंबित लाभांबाबत सरकारने कोणतीच स्पष्टता दिलेली नाही. ई-केवायसी आणि पात्रता पडताळणीची प्रक्रिया पूर्ण करून पात्र महिलांना त्यांचे पैसे मिळतील अशी व्यवस्था सरकारने करायला नको का? नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यानंतर केवळ बियाणे आणि खतांसाठीची तुटपुंजी मदत पुरेशी ठरत नाही. सोयाबीन, कापूस, तूर, मका यासह अन्य पिकांचे प्रत्यक्ष नुकसान लक्षात घेऊन भरपाई मिळाली पाहिजे. संबंधित पिकांसाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत निश्चित केलेली संरक्षित रक्कम हा किमान भरपाईचा आधार मानावा, अशी मागणी होत आहे. कर्जमाफीची घोषणा होऊनही पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होण्यास विलंब होत आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांच्या अनुदानापुरते मर्यादित ठेवण्यात आल्याने त्यांच्यातही नाराजी आहे. कर्जमाफीची रक्कम वेळेत न मिळाल्यास पुढील हंगामासाठी पीक कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात, हे सरकारने लक्षात घ्यायला हवे. दुष्काळाच्या निकषांमध्ये खरंच शेतकऱ्यांचे प्रत्यक्ष नुकसान पाहिले जाते का? हा प्रश्नच आहे.

# आणिबाणी, हुकुमशहा वगैरे

झाडाझडती



विनोद देशमुख
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर

मतदार याद्यांच्या एसआयआरवरून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना घेरण्याचा प्रयत्न सरकारविरोधकांनी करण्यात गैर काहीच नाही. परंतु, त्यासाठी त्यांनी जो मार्ग निवडला आहे, तो लोकांना त्रास देणारा आहे आणि तो त्यांच्यावरच उलटू शकतो, ही गोष्ट माजी राज्यकर्ते असलेल्या विरोधकांना समजत कशी नाही, याचेच आश्चर्य वाटते. आपल्याकडे जेथे एक दिवसाचे आंदोलन सुद्धा जनजीवन ढवळून टाकते, तेथे कॉंग्रेसचे युवराज राहुल गांधी म्हणतात, "आम्ही आंदोलन वर्षभर, दोन वर्षे चालवू. देशभर ठिकठिकाणी आंदोलन करू." याचा सरळ अर्थ, भारतात आम्ही नेपाळ, बांगला देश, फ्रान्स सारखा गोंधळ घालू, अराजक माजवू अशी थेट धमकीच! भारतासारख्या विशाल देशात असे दररोज आंदोलन दीर्घकाळ (उदाहरण- शाहिन बाग, दिल्ली) कुठे ना कुठे होत राहिले तर सुरक्षा यंत्रणांवर, व्यवस्थांवर किती ताण येईल आणि जनतेचे किती हाल होतील, याचा विचार केला का राहुल आणि त्यांच्या सोबत्यांनी?

राहुल गांधी म्हणतात- देशात अघोषित आणिबाणी आहे. काक्रोच जनता पार्टीचे अभिजित दीपके म्हणतात- मोदी घाबरट हुकुमशहा आहे. कोणत्या मापदंडाने ठरवले हे तुम्ही? देशाच्या कोणत्या भागात आणिबाणीसदृश परिस्थिती दिसते? प्रतिबंधित जागी आंदोलन, सुप्रीम कोर्टावर चालून जाणे, वाहतूक अडवून जनतेला त्रास देणे यासारख्या कृत्यांना पायबंद घालणे ही आणिबाणीची लक्षणे आहेत काय? राहुल यांची आजी इंदिरा गांधी यांनी १९७५ मध्ये आणिबाणीच्या नावाने जी दडपशाही केली, जनतेचा छळ केला तेव्हा तुम्ही बालक होता साहेब. तो त्रास भोगणारे लोक आज सत्तरी पार आहेत आणि अनेक जण जीवास मुकले आहेत. त्या प्रकाराला आणिबाणी म्हणतात.

तुमच्याच इंडिया आघाडीत असलेल्या पूर्वीच्या कॉंग्रेसविरोधी पक्षांना विचारा जरा. (यात उबाठा शिवसेना नाही. कारण, तेव्हा ते तुमच्या बाजूने होते. आणिबाणीचे समर्थक होते. आता मात्र ते सोयीने आणिबाणीचे विरोधक झाले आहेत.) आंदोलन करणे तर सोडा; साधे पत्रक वाटणे, चार लोकांनी एकत्र येणे हे तेव्हा गुन्हे होते. आमच्यासारखे अनेक तरुण त्यासाठी तुरुंगात डांबले जायचे. तुम्हाला तर आंदोलन करण्याची मुभा आहे. पंतप्रधानांपासून ते संवैधानिक संस्थांवर वाटेल ते बोलण्याची सवलत आहे. सुप्रीम कोर्टावर हल्लाबोल मोर्चा नेण्याचे स्वातंत्र्य आहे. तरीही तुम्ही लोक मोदींना हुकुमशहा म्हणता? आधी इंदिरा गांधींची हुकुमशाही कबूल करा. मग बोला.

खऱ्या आणिबाणीत आंदोलन पूर्णतः स्वदेशी होते. लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्यासारखे तपस्वी नेते होते. याउलट, तुमच्या आंदोलनाची नाळ परदेशांशी जुळली असल्याचे स्पष्टपणे जाणवते. कोण ती नेहा बोरा. सरळ म्हणते, "बांगला देशातील उद्रेक ही आमची प्रेरणा आहे." तो हिंसक होता आणि परकीय फंडिंगवर घडविण्यात आला, हे जगजाहीर आहे. कोणी म्हणतो, "आमच्या प्रमुख नेत्यांचे मोबाईल चोवीस तास पोलिसांच्या ताब्यात होते. त्यात काहीतरी घुसडून आम्हाला बदनाम केले जाऊ शकते." परकीय शक्तींशी असलेले लागेबांधे पुराव्यानिशी उघड होण्याची भीती वाटते का?

नेमक्या याच सुमाराला इलान मस्क नावाचा जगातील सर्वात धनाढ्य माणूस (१.१ ट्रिलियन डॉलर्स संपत्ती असलेला पहिला मानव. १.१ ट्रिलियन डॉलर्स म्हणजे सुमारे शंभर पद्म रुपये) भारत सरकारवर तोफ डागतो, अंबानीवर आगपाखड करतो. या साऱ्यांमधून काय संकेत मिळतो? भारतात गोंधळ माजवून संवैधानिक सरकार खाली खेचण्याचे कटकारस्थान परदेशात शिजले आहे. तेही "संविधान बचाव" असा उलटा नारा द्यायला लावून! भारतीय जनतेने हे समजून घेतले पाहिजे. जे सुप्रीम कोर्टावर मोर्चा नेतात, मतचोरीचे ठोस पुरावे न देताच आरडाओरड करतात, साधी जनहित याचिका ज्यांना नीट सादर करता येत नाही, कायदापालन ज्यांना मान्यच नाही असे लोक कधीतरी संविधानवादी असू शकतील का, याचा सर्वांनीच थंड डोक्यानं विचार करण्याची नितांत गरज आहे. देशांतर्गत राजकीय संघर्ष वेगळा अन् मुद्दाम उचकावलेले, परदेशस्थांनी प्रायोजित केलेले आपल्या लोकशाहीवरील आणि संविधानावरील आक्रमण वेगळे!

# लोकशाहीचा पहारेकरी: वकील आणि संविधान

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

'लोकशाहीचा पहारेकरी: वकील आणि संविधान' हा भारतीय लोकशाही, न्यायव्यवस्था आणि घटनात्मक मूल्यांचे रक्षण करणाऱ्या वकील वर्गाच्या भूमिकेवर प्रकाश टाकणारा एक अत्यंत महत्त्वाचा आणि मार्गदर्शक विषय आहे. कोणत्याही लोकशाही देशात संविधान हा देशाचा सर्वोच्च कायदा असतो आणि वकील हे त्या संविधानाचे कायदेशीर रक्षक किंवा 'पहारेकरी' म्हणून काम करतात.

भारतीय संविधान हा केवळ एक कायदेशीर दस्तऐवज नसून तो एका प्रगल्भ आणि पवित्र समाजाचा आरसा आहे. या आरशात समाजातील प्रत्येक नागरिकाचे हक्क, कर्तव्ये आणि अधिकार यांचे स्पष्ट प्रतिबिंब उमटते. लोकशाहीच्या या सर्वोच्च ग्रंथाची अंमलबजावणी आणि रक्षण करण्याची सर्वांत मोठी जबाबदारी न्यायव्यवस्थेवर असते आणि या व्यवस्थेचा सर्वांत महत्त्वाचा दुवा म्हणजे वकील होय. परंतु, जेव्हा कायद्याचे रक्षक आणि संविधानाचे अभ्यासक असलेले वकीलच आक्रमक होऊन रस्त्यावर उतरतात किंवा न्यायालयाच्या सर्वोच्च मंदिरातच अप्रिय वर्तन करतात, तेव्हा समाजाच्या मनात साहजिकच अनेक गंभीर प्रश्न निर्माण होतात.

१३ ऑक्टोबर २०२६ रोजी देशाच्या राजधानीत आणि सर्वोच्च न्यायालयात घडलेला प्रसंग याच चिंतेत भर घालणारा ठरला आहे. दिल्लीमध्ये नागरिक न्याय आणि शांततेसाठी पुकारण्यात आलेल्या आंदोलनावरून वातावरण अत्यंत तापलेले असताना, सर्वोच्च न्यायालयात एका सुनावणीदरम्यान एका वकिलाचा पारा अचानक चढला. सद्यस्थितीचे गांभीर्य मांडताना या वकिलाने थेट न्यायाधीशांशीच शाब्दिक वाद घातला आणि भर न्यायालयात अत्यंत आक्रमकपणे "देश जळत आहे" असे उद्विग्न उद्गार काढले. या घटनेमुळे न्यायव्यवस्थेचे पावित्र्य आणि वकिलांची जबाबदारी यावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

कायद्याच्या परिभाषेत वकिलाला केवळ एक व्यावसायिक न मानता न्यायालयाचा अधिकारी मानले जाते. न्यायालयाला सत्य शोधून काढण्यासाठी आणि योग्य न्यायदान करण्यासाठी मदत करणे, तसेच अन्यायग्रस्त सामान्य नागरिकाला त्याचा कायदेशीर हक्क मिळवून देणे हे वकिलाचे सर्वोच्च कर्तव्य असते. संविधानाने नागरिकांना जसे मूलभूत अधिकार दिले आहेत, तसेच मूलभूत कर्तव्यांचे भानही दिले आहे. वकिलांनी हे कायम लक्षात ठेवले पाहिजे की ते केवळ पक्षकाराचे प्रतिनिधी नसून संविधानाचे रक्षक आहेत. समाजात कायद्याचा आदर निर्माण करणे आणि कायदेशीर प्रक्रियेचा गैरवापर रोखणे ही त्यांची प्राथमिक जबाबदारी आहे. लोकशाहीत आपल्या न्याय्य मागण्यांसाठी, जसे की वकील संरक्षण कायदा लागू करणे किंवा पायाभूत सुविधांची मागणी करणे, यासाठी आवाज उठवणे हा प्रत्येकाचा घटनात्मक अधिकार नक्कीच आहे, परंतु या अधिकारांचा वापर करताना कर्तव्यांचा विसर पडू देणे लोकशाहीसाठी घातक ठरू शकते.

जेव्हा वकील आक्रमक होऊन आंदोलने करतात, संपावर जातात किंवा न्यायालयाच्या कामकाजावर बहिष्कार टाकतात, तेव्हा ते एका अर्थाने न्यायव्यवस्थेचे कामकाज वेठीस धरत असतात. वकिलांच्या संपामुळे हजारो खटल्यांच्या तारखा पुढे ढकलल्या जातात आणि न्यायदानाची प्रक्रिया पूर्णपणे ठप्प होते. उशिरा मिळालेला न्याय हा नाकारलेल्या न्यायासारखाच असतो, ही बाब इथे प्रकर्षाने जाणवते. सामान्य, गरीब आणि आधीच त्रस्त असलेल्या पक्षकाराला या संपाचा सर्वांत मोठा फटका बसतो. सर्वोच्च न्यायालयानेही अनेकदा स्पष्ट केले आहे की, वकिलांनी संप करणे किंवा कामकाजात अडथळा आणणे हे बेकायदेशीर आहे. वकिलांनी आपले हक्क मागताना न्यायव्यवस्थेचे चाक थांबणार नाही याची काळजी घेणे हे त्यांचे सर्वोच्च कर्तव्य आहे. आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी संप किंवा कामकाजात अडथळा आणण्याऐवजी, कायदेशीर आणि शांततापूर्ण मार्गांचा अवलंब करणे त्यांच्याकडून अपेक्षित असते.

सध्याच्या काळात वकिलांच्या राजकीय भूमिकांचा मुद्दाही अत्यंत संवेदनशील बनला आहे. कोणत्याही राजकीय भूमिकेशी जुळवून घेत असताना संविधानातील मूल्ये वकिलांनी जोपासलीच पाहिजेत. प्रत्येक नागरिकाप्रमाणे वकिलांचीही स्वतःची वैयक्तिक राजकीय विचारधारा असू शकते, परंतु जेव्हा ते काळा कोट घालून न्यायालयात उभे राहतात, तेव्हा संविधान हीच त्यांची सर्वोच्च आणि अंतिम विचारधारा असली पाहिजे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात आणि संविधान निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, पंडित नेहरू, सरदार पटेल यांसारख्या अनेक महान वकिलांनी महत्त्वाची राजकीय भूमिका बजावली होती. मात्र, त्यांनी आपले राजकारण नेहमीच लोकशाही, समानता आणि न्यायाच्या मूल्यांवर आधारित ठेवले. आजच्या काळात राजकीय निष्ठा संविधानाच्या मूल्यांपेक्षा मोठी होऊ शकत नाही. राजकीय अजेंडा पुढे रेटण्यासाठी किंवा राजकीय विरोधकांना लक्ष्य करण्यासाठी जेव्हा कायदेशीर प्रक्रियेचा हत्यार म्हणून वापर केला जातो, तेव्हा ते संविधानाच्या मूळ तत्त्वांशी प्रतारणा करण्यासारखे असते.

सामान्य माणूस न्यायव्यवस्थेकडे अतिशय आशेने आणि आदराने पाहतो, त्यामुळे या व्यवस्थेवरील विश्वास टिकवून ठेवणे ही सर्वांचीच सामूहिक जबाबदारी आहे. जर वकिलांनी केवळ राजकीय भूमिकेपोटी आक्रमक आंदोलने केली किंवा एकांगी भूमिका घेतली, तर समाजाचा न्यायव्यवस्थेवरील आणि कायद्यावरील विश्वास उडायला वेळ लागणार नाही. वकिलांची भूमिका ही समाजाला जोडणारी असावी, राजकीय द्वेषापोटी तोडणारी नसावी. सत्ता आणि राजकारण बदलत राहील, राजकीय प्रवाह येतील आणि जातील, पण संविधान शाश्वत आहे. त्यामुळे न्यायव्यवस्थेचा समतोल राखण्यासाठी वकिलांनी संविधानाचा कायदेशीर आत्मा आणि नैतिकता जपणे अत्यंत आवश्यक आहे. वकिलांनी आपल्या मूलभूत कर्तव्यांचे भान ठेवून जर जबाबदारीने पावले उचलली नाहीत, तर संविधानाच्या या पवित्र आरशाला तडे जाण्यास आणि लोकशाहीचा पाया कमकुवत होण्यास वेळ लागणार नाही. संविधान हा लोकशाहीचा पाया आहे, तर वकील हे त्या पायाचे आणि छताचे रक्षण करणारे सजग पहारेकरी आहेत.

वकील हा केवळ न्यायालयात फी घेऊन केस लढणारा माणूस नसून, तो समाजातील न्याय आणि समतेचा दूत असतो. संविधानाच्या चौकटीत राहून लोकशाहीचे स्तंभ मजबूत ठेवण्याचे काम वकील करतात. जोपर्यंत देशात संविधानाचा आदर करणारे आणि निर्भीडपणे लढणारे वकील आहेत, तोपर्यंत भारताची लोकशाही सुरक्षित राहील.

थोडक्यात सांगायचे तर, संविधान जर लोकशाहीचा आत्मा असेल, तर वकील हे त्या आत्म्याचे रक्षक आहेत. वकील केवळ न्यायालयात खटले लढत नाहीत, तर ते लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी सजग पहारेकऱ्याची भूमिका बजावतात. जोपर्यंत देशात निष्पक्ष आणि धाडसी वकील आहेत, तोपर्यंत संविधानाची आणि लोकशाहीची मूल्ये सुरक्षित राहतील.

- ९५६१५९४३०६

# भारताच्या झोळीत विजय पडणार, की विंडीज देणार धक्का?

## भारत-विंडीज : पाचवा आणि निर्णायक टी-२० सामना

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

पाच सामन्यांच्या मालिकेतील अखेरचा सामना हा केवळ विजय-पराजयाचा प्रश्न नसतो; तो संघाची मानसिकता, खेळाडूंची दबावाखाली कामगिरी करण्याची क्षमता आणि निर्णायक क्षणी डावपेचांची अंमलबजावणी यांचीही परीक्षा असते. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील पाचव्या टी-२० सामन्याकडे पाहताना याच बाबी महत्त्वाच्या ठरणार आहेत.

मात्र, हा सामना भारताच्या झोळीत पडेल की वेस्ट इंडिज बाजी मारेल, याचे उत्तर केवळ नावाजलेल्या खेळाडूंच्या उपस्थितीत नाही. प्रत्यक्ष मैदानावर कोण चुका कमी करतो, कोण प्रतिस्पर्ध्याच्या कमकुवत बाजूचा अचूक वेध घेतो आणि कोण संकटाच्या वेळी संयम राखतो, यावरच निकालाची दिशा ठरेल.

**मालिकेचा आजवरचा प्रवास : दोन्ही संघ तुल्यबळ**

१७ ऑक्टोबर २०२६ रोजी बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर होणाऱ्या पाचव्या सामन्यापूर्वी मालिका २-२ अशी बरोबरीत आहे. भारताने पहिला आणि तिसरा सामना जिंकला, तर वेस्ट इंडिजने दुसऱ्या आणि चौथ्या सामन्यात विजय मिळवला. या निकालांमधून एक गोष्ट स्पष्ट होते. भारताला घरच्या मैदानाचा फायदा असला, तरी वेस्ट इंडिजला कमी लेखणे धोक्याचे ठरेल.

**भारताच्या विजयाची गुरुकिल्ली कुठे? फलंदाजांनी जबाबदारी स्वीकारणे आवश्यक**

हैदराबादमधील चौथ्या सामन्यात वेस्ट इंडिजने २० षटकांत ३ बाद २४७ धावा केल्या. शाय होपने नाबाद १०२ धावांची खेळी केली. प्रत्युत्तरात भारताला २२३ धावांपर्यंतच मजल मारता आली आणि २४ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. या पराभवातून भारतीय फलंदाजीसमोरचा महत्त्वाचा प्रश्न पुढे येतो. मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना आक्रमकता आणि संयम यांचा समतोल राखला जातो आहे का? सुरुवातीच्या षटकांत धावांचा वेग वाढवणे आवश्यक असले, तरी प्रत्येक चेंडू सीमापार मारण्याचा अट्टहास घातक ठरू शकतो. पॉवरप्लेमध्ये चांगली सुरुवात मिळाल्यानंतर मधल्या षटकांत विकेट्सची पडझड टाळणे आणि शेवटच्या षटकांसाठी फलंदाज राखून ठेवणे महत्त्वाचे आहे.

**शाय होपला रोखण्याचे आव्हान**

वेस्ट इंडिजचा कर्णधार शाय होप सध्या भारतीय गोलंदाजांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. त्याने चौथ्या सामन्यात संयमी सुरुवातीनंतर आक्रमक फलंदाजी करत शतक झळकावले. त्याला शेरफेन रदरफोर्ड आणि शिमरॉन हेटमायर यांचीही साथ मिळाली. होपला लवकर बाद करण्यासाठी भारतीय गोलंदाजांना केवळ वेगावर अवलंबून राहून चालणार नाही. अचूक टप्पा, चेंडूतील बदल, क्षेत्ररक्षणातील योग्य रचना आणि फलंदाजाच्या फटक्यांच्या सवयींचा अभ्यास यांचा प्रभावी वापर करावा लागेल.

**गोलंदाजांनी धावांना वेसण घालावी**

टी-२० क्रिकेटमध्ये २४० ते २५० धावांचे लक्ष्यही गाठले जाऊ शकते, हे या मालिकेने दाखवून दिले आहे. त्यामुळे केवळ बळी मिळवणे पुरेसे नाही; धावांचा वेग नियंत्रित करणेही तितकेच आवश्यक आहे. विशेषतः अखेरच्या पाच षटकांत यॉर्कर, संथ चेंडू आणि योग्य आखूड टप्प्याच्या चेंडूंचा नियोजनबद्ध वापर गरजेचा आहे. क्षेत्ररक्षकांनी झेल सोडणे किंवा सीमारेषेवर सहज धावा देणे टाळले, तर भारताला सामन्यावर पकड मिळवता येईल.

**बंगळुरूची खेळपट्टी कोणाला साथ देणार?**

बंगळुरूचे चिन्नास्वामी स्टेडियम मोठ्या धावसंख्येसाठी ओळखले जाते. तुलनेने लहान सीमारेषा आणि फलंदाजीला अनुकूल परिस्थिती यांमुळे येथे गोलंदाजांसाठी चुकांना फारशी जागा नसते.नाणेफेक जिंकणारा कर्णधार दव आणि सामन्याच्या वेळेतील परिस्थितीचा विचार करून निर्णय घेईल. मात्र, नाणेफेकीचा कौल हा विजयाचा हमखास मार्ग नाही. प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघाने मोठी धावसंख्या उभारली आणि गोलंदाजांनी शिस्त राखली, तर प्रतिस्पर्ध्यावरील दबाव वाढू शकतो.

**भारतासाठी निर्णायक ठरू शकणारे खेळाडू**

अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसनः आक्रमक सुरुवात करून मोठ्या धावसंख्येचा पाया घालण्याची जबाबदारी.

तिलक वर्मा आणि श्रेयस अय्यरः मधल्या षटकांत डाव सावरणे, भागीदाऱ्या उभारणे आणि योग्य वेळी आक्रमण वाढवणे.

अर्शदीप सिंग आणि अक्षर पटेलः महत्त्वाच्या टप्प्यांवर बळी मिळवणे आणि धावगतीवर नियंत्रण ठेवणे.

शाय होप आणि शेरफेन रदरफोर्डः भारतीय गोलंदाजांवर दबाव आणण्याची वेस्ट इंडिजची प्रमुख अस्त्रे.

या खेळाडूंची अंतिम भूमिका आणि संघनिवड सामन्याच्या दिवशी जाहीर होणाऱ्या अंतिम अकरावर अवलंबून असेल.

**अखेरचा कौल : भारताच्या झोळीत विजय पडणार?**

भारताला घरच्या मैदानाचा फायदा, मालिकेतील आधीच्या दोन विजयांचा आत्मविश्वास आणि सक्षम फलंदाजीची ताकद आहे. परंतु वेस्ट इंडिजनेही दोन सामने जिंकून आपली क्षमता सिद्ध केली आहे. त्यामुळे भारतीय संघाने केवळ प्रतिस्पर्ध्याच्या आक्रमणाला उत्तर देण्याऐवजी स्वतःच्या रणनीतीनुसार खेळणे आवश्यक आहे.

भारताने सुरुवातीला विकेट्स राखल्या, मधल्या षटकांत भागीदाऱ्या केल्या आणि गोलंदाजांनी होपसारख्या फलंदाजाला मोठी खेळी करण्यापासून रोखले, तर विजयाची शक्यता निश्चितच वाढेल. उलट, पुन्हा एकदा गोलंदाजी महागडी ठरली किंवा फलंदाजांनी घाई केली, तर वेस्ट इंडिज मालिका जिंकण्याची संधी साधू शकतो.

**अर्शदीपच्या दुखापतीने भारताची चिंता वाढली; भुवनेश्वर कुमार पुनरागमन करणार?**

भारताच्या गोलंदाजीसमोरील सर्वांत मोठा प्रश्न म्हणजे अर्शदीप सिंगची उपलब्धता. चौथ्या सामन्यात अखेरच्या षटकात फलंदाजी करताना दुखापत झाल्यामुळे तो निर्णायक सामन्याला मुकण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत भारतीय संघव्यवस्थापनाला पर्यायी वेगवान गोलंदाजाचा विचार करावा लागू शकतो.

**भुवनेश्वर कुमारला संधी मिळाली तर ती भारतासाठी कितपत फायदेशीर ठरेल?**

भुवनेश्वर हा केवळ अनुभवी गोलंदाज नाही, तर नव्या चेंडूला स्विंग देण्याची क्षमता असलेला गोलंदाज आहे. पॉवरप्लेच्या षटकांत चेंडू दोन्ही बाजूंना वळवून फलंदाजांना अडचणीत आणणे, अचूक टप्प्यावर गोलंदाजी करणे आणि अनुभवाच्या जोरावर फलंदाजांच्या हालचालींचा अंदाज घेणे ही त्याची बलस्थाने आहेत. बंगळुरूच्या फलंदाजीला अनुकूल खेळपट्टीवर सुरुवातीच्या षटकांत एखादा बळी मिळवणे निर्णायक ठरू शकते.

शाय होप आणि वेस्ट इंडिजच्या आक्रमक फलंदाजांना सुरुवातीलाच रोखण्यात भुवनेश्वर यशस्वी झाला, तर भारताला सामन्यावर पकड मिळवण्याची संधी मिळेल.

मात्र, अर्शदीप आणि भुवनेश्वर यांच्या गोलंदाजीच्या शैलीत फरक आहे. अर्शदीपचा डावखुरा वेग आणि अखेरच्या षटकांतील गोलंदाजीचा अनुभव भारतासाठी महत्त्वाचा आहे.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून सुविधांची पाहणी

## धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात, अनुयायांसाठी निवारा, आरोग्य व सुरक्षेच्या चोख व्यवस्था

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दीक्षाभूमी येथे आयोजित ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर अनुयायांसाठी उभारण्यात येणारे निवारा डोम, आरोग्य सुविधा आणि अन्य नागरी सुविधांच्या तयारीची जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित यंत्रणांना आवश्यक मार्गदर्शक सूचना देत कोणत्याही मूलभूत सुविधेत त्रुटी राहणार नाहीत, याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले.



यावेळी त्यांच्यासमवेत अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण महिरे आणि मनपाचे अतिरिक्त आयुक्त मिलींद मेश्राम, समाजकल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे व इतर विभागाचे अधिकारी उपस्थित होते. दीक्षाभूमी परिसरात अनुयायांच्या निवासासाठी उभारण्यात येत असलेल्या डोमची तसेच अन्य व्यवस्थांची माहिती सुकेशिनी तेलगोटे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिली. याठिकाणी महिलांसाठी हिरकणी कक्ष तयार करण्यात येत असून, एका डोममध्ये सुमारे ५०० अनुयायांच्या निवासाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

### २४ तास पाणीपुरवठा, स्वच्छता आणि नियंत्रण कक्ष

धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्यासाठी आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. अनुयायांसाठी निवाऱ्याची व्यवस्था, २४ तास पाणीपुरवठा, दिवसरात्र स्वच्छता आणि मार्गदर्शनासाठी नियंत्रण कक्षाची उभारणी करण्यात येत आहे. रविवार, १८ ऑक्टोबरपासून या सुविधा अनुयायांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

सोहळ्याच्या मुख्य दिवशी तसेच अन्य दिवशी दीक्षाभूमीवर येणाऱ्या लाखो अनुयायांना आवश्यक सुविधा मिळाव्यात, यासाठी प्रशासनाकडून नियोजन करण्यात आले आहे. आरोग्य, स्वच्छता, पिण्याचे पाणी, निवास आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

### १ हजार २३५ हून अधिक स्वच्छतागृहाची व्यवस्था

अनुयायांच्या सोयीसाठी महिला आणि पुरुषांकरिता स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. आयटीआय परिसर, आरोग्य उपसंचालक कार्यालय (माता कचेरी) आणि कारागृहाच्या जागेत मिळून १ हजार २३५ हून अधिक स्वच्छतातागृहे उभारण्यात आली आहेत. त्यामुळे मोठ्या संख्येने येणाऱ्या अनुयायांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर प्रशासनाने भर दिला आहे.

### आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी यंत्रणा सज्ज

सोहळ्यादरम्यान उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एसडीआरएफ) पथकांच्या व्यवस्थेचेही नियोजन करण्यात आले आहे. निवारा केंद्रांमध्ये अग्निशमन विभागामार्फत आग विझविण्याची व्यवस्था करण्यात आली असून, अनुयायांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्यासाठी येणाऱ्या प्रत्येक अनुयायाला सुरक्षित, स्वच्छ आणि आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी प्रशासनाने तयारीला अंतिम स्वरूप दिले आहे. सोहळ्याच्या काळात कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व संबंधित विभागांनी सतर्क राहून काम करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

## थोडक्यात

### खैरी, कोंढाळी येथे जागतिक कापूस दिन उत्साहात साजरा

#### शास्त्रीय शेती, दर्जेदार कापूस उत्पादन व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर

**दै. सिंहवाणी वृत्त, कोंढाळी**

नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील खैरी, कोंढाळी येथे ७ ऑक्टोबर रोजी CITI-CDRA आणि CIRCOT यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक कापूस दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांना शास्त्रीय कापूस लागवड, गुलाबी बोंडअळी व्यवस्थापन, जमिनीचे आरोग्य, बायोचार तंत्रज्ञान आणि दर्जेदार कापूस उत्पादनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाला खैरीच्या सरपंच रोशना निभोरकर, CIRCOT चे ज्येष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. के. पांडियन, डॉ. वर्षा साटणकर, डॉ. शेख मुख्तार मन्सुरी, डॉ. सुजन अडक, इंडोकाउंटचे व्यवस्थापक प्रशांत टेकाडे आणि CITI-CDRA चे प्रकल्प समन्वयक गोविंद एच. वैराळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी स्वच्छ व प्रदूषणमुक्त कापूस उत्पादन, कीटकनाशकांचा विवेकपूर्ण वापर, सुधारित लागवड पद्धती आणि गुणवत्तेच्या आधारे चांगला बाजारभाव मिळविण्याचे महत्त्व विशद करण्यात आले. तसेच बायोचार तंत्रज्ञान व कार्बन क्रेडिटच्या संभाव्य फायद्यांबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. उच्च कापूस उत्पादन घेतल्याबद्दल प्रगतिशील शेतकरी स्वप्निल शेळके (चिस्तूर, ता. आष्टी) - २२ क्विंटल प्रति एकर, मनोहर कुहिके (खैरी, कोंढाळी) - १६ क्विंटल प्रति एकर आणि सचिन चराडे (वायगाव, ता. वरोरा) - १५ क्विंटल प्रति एकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन युगांतर मेश्राम यांनी केले, तर आभार प्रदर्शन अमित कावडे यांनी केले. या उपक्रमातून शेतकऱ्यांमध्ये आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि गुणवत्तापूर्ण कापूस उत्पादनाबाबत जनजागृती करण्यात आली.

# पदवीधर बेरोजगारांच्या निश्चित रोजगारासाठी कटिबद्ध

## विविध संस्था, संघटनांच्या संवाद भेटीत काँग्रेसचे अभिजित वंजारी यांचे आश्वासन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पदवीधर मतदारसंघातील मतदारांच्या अपेक्षा जाणून घेणे, त्यांच्या समस्या समजून घेणे आणि त्या विधिमंडळात प्रभावीपणे मांडणे याला आपले प्राधान्य राहील. यासोबत पदवीधर बेरोजगारांच्या रोजगारासाठी आपण कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाचे काँग्रेस, महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजीत वंजारी यांनी केले. निवडणूक प्रचाराच्या अनुषंगाने अभिजित वंजारी यांनी नागपूर शहर व जिल्ह्यातील विविध संस्था आणि संघटनांना भेटी देत पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्त्यांशी संवाद साधला, याप्रसंगी ते बोलत होते. या भेटींच्या माध्यमातून त्यांनी विविध विषयांवर चर्चा केली, तसेच निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. पदवीधर, शिक्षक आणि कर्मचारी वर्गाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आपण कटिबद्ध असल्याचे ते म्हणाले. अभिजित वंजारी यांनी व्हिनस स्पोर्ट्स असोसिएशन, रेशीमबाग, नागपूर येथे सदिच्छा भेट देऊन वंजारी यांनी उपस्थित पदाधिकारी व सदस्यांशी संवाद साधला. यावेळी विविध विषयांवर सकारात्मक चर्चा झाली.

वाठोडा आणि रेशीमबाग, नागपूर येथे निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकांमध्ये सहभागी होत त्यांनी निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधून विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. श्री संताजी महाविद्यालय, नागपूर येथे आयोजित आढावा बैठकीतही वंजारी सहभागी झाले. यावेळी त्यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधत निवडणुकीच्या नियोजनाबाबत चर्चा केली. नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंजारी यांनी विविध संस्था, संघटना आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत प्रचाराला गती दिली आहे.

# २४ वर्षीय विद्यार्थ्याचा धिंगाणा, तीन ते चार जण जखमी

**पुणे :** पुण्यात २४ वर्षीय तरुणाने मद्यधुंद अवस्थेत बेदरकारपणे कार चालवत रस्त्यावर धिंगाणा घातला. दारुच्या नशेत कार चालवताना त्याने तीन ते चार दुचाकींना धडक दिली. रात्री आठच्या सुमारास कोथरूडमधील एमआयटी महाविद्यालयासमोरील रस्त्यावर हा प्रकार घडला. या अपघातात तीन ते चार दुचाकीस्वार किरकोळ जखमी झाल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. अपघातानंतर संतप्त नागरिकांनी कारचालकाला पकडून चोप देत पोलिसांच्या ताब्यात दिले. कोथरूड पोलिसांनी २४ वर्षीय विद्यार्थ्याला ताब्यात घेतले असून, त्याला वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आले.

# बुद्ध नगरात ५६ फुटांचा भव्य महाबोधी महाविहाराचा देखावा, १२ हजार चौरस फुटांच्या डोममध्ये अडीच हजार वर्षांचा बौद्ध इतिहास

## शासकीय अनुदानाशिवाय युवा समूहाचा अभिनव उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्मक्रांतीचा वारसा जपणाऱ्या नागपूरच्या बुद्ध नगरातील बुद्ध पार्क येथे नागपूर बुद्धिस्ट कॉन्सोर्टियम या युवा समूहाने साकारलेला महाबोधी महाविहाराचा भव्य देखावा नागरिकांचे विशेष आकर्षण ठरत आहे. ५६ फूट उंच आणि सुमारे १२० फूट लांबीच्या महाबोधी महाविहाराच्या प्रतिकृतीसह १२ हजार चौरस फुटांच्या भव्य डोममध्ये अडीच हजार वर्षांचा बौद्ध इतिहास, धम्मविचार आणि सामाजिक परिवर्तनाचा प्रवास उलगडण्यात आला आहे.

हा देखावा १३ ते २२ ऑक्टोबरदरम्यान नागरिकांना पाहता येणार असून, प्रदर्शनाची वेळ सकाळी ९ ते रात्री १२ वाजेपर्यंत आहे. या प्रदर्शनात सम्राट अशोकाचे कलिंग युद्धानंतर झालेले हृदयपरिवर्तन, अहिंसा आणि धम्माचा प्रसार, प्राचीन नालंदा विद्यापीठाचा



ज्ञानवारसा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक योगदान, भारतीय संविधान आणि राष्ट्रध्वजातील अशोकचक्राचे महत्त्व यांची आकर्षक मांडणी करण्यात आली आहे. डोंगेश्वरी पर्वताचे प्रतिरूप आणि बोधगया येथील तथागत गौतम बुद्धांच्या मूर्तीवर आधारित प्रतिकृती ही प्रदर्शनाची प्रमुख आकर्षणे आहेत.

### सामाजिक परिवर्तनाचा प्रेरणादायी संदेश

प्रदर्शनात एका बाजूला अस्पृश्यता, सामाजिक विषमता आणि शिक्षणापासून वंचित राहण्याची ऐतिहासिक परिस्थिती, तर दुसऱ्या बाजूला शिक्षण, रोजगार, प्रशासकीय सेवा, उद्योग आणि व्यावसायिक प्रगतीच्या माध्यमातून घडलेले परिवर्तन दर्शविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षण, संघटन आणि संघर्षाचा संदेश तसेच १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर झालेली ऐतिहासिक धम्मदीक्षा या परिवर्तनाच्या प्रवासाचे महत्त्वाचे टप्पे म्हणून अधोरेखित करण्यात आले आहेत.

### शासकीय अनुदानाशिवाय युवा शक्तीचा आविष्कार

या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे आयोजकांच्या माहितीनुसार, कोणत्याही शासकीय अनुदानाशिवाय युवा कार्यकर्त्यांनी वर्गणी, श्रमदान आणि सामूहिक प्रयत्नांतून हा भव्य देखावा उभारला आहे. प्रामुख्याने २० ते ३५ वर्षे वयोगटातील तरुणांनी नियोजन, कलात्मक प्रतिकृती, डोम आणि दृश्यात्मक मांडणीच्या माध्यमातून हा उपक्रम साकारला आहे. इतिहासाचे जतन, बौद्ध विचारांचा प्रसार आणि सामाजिक प्रबोधन हे या प्रदर्शनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

नागपूरला दीक्षाभूमीमुळे भारतीय बौद्ध चळवळीच्या इतिहासात विशेष स्थान आहे. अशा शहरात बौद्ध इतिहास आणि सामाजिक परिवर्तनाची ओळख नव्या पिढीला करून देणारा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे. विद्यार्थी, तरुण, कुटुंबे आणि बौद्ध इतिहासात रस असलेल्या नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या १२४ व्या जयंतीनिमित्त अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

प. पूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती आणि डॉ.आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची १२४ वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला स्मारक समितीचे अध्यक्ष विलास गजघाटे, समितीचे सदस्य एन.आर.सुटे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.ए.मेहेरे उपस्थित होते. मान्यवरांनी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी स्मारक समितीचे अध्यक्ष विलास गजघाटे यांनी आपल्या भाषणातून दादासाहेब गायकवाड यांच्या कार्याचा आढावा घेतला. ते म्हणाले, 'एका महान पर्वाला, एका क्रांतिसूर्याला अभिवादन करण्यासाठी आपण येथे जमलो आहोत. दलित, शोषित आणि शेतमजुरांच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे महानायक, लोकनेते आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विश्वासू सहकारी तसेच भूमिहीनांचे कैवारी म्हणून कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची ओळख होती.

ते पुढे म्हणाले की, कर्मवीर दादासाहेब गायकवाड हे केवळ एक नाव नसून तो एक जिवंत इतिहास आहे. नाशिकचा ऐतिहासिक काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह असो किंवा भूमिहीनांचा सत्याग्रह, प्रत्येक लढ्यात त्यांनी सत्याची आणि अन्यायाविरुद्धच्या संघर्षाची ढाल बनून पुढाकार घेतला. जमीन कसणाऱ्याची, जमीन राबणाऱ्याची हा नारा देत त्यांनी महाराष्ट्रातील भूमिहीनांच्या जीवनाला नवी दिशा दिली. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हजरत बाबा ताजुद्दीन महाविद्यालयातील कु. रोझी फातिमा हिला आंतर महाविद्यालयीन मेहंदी स्पर्धेत प्रथम पारितोषिक




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्री निकेतन आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, तुळशीबाग रोड, नागपूर येथे आयोजित आंतरमहाविद्यालयीन मेहंदी स्पर्धेत हजरत बाबा ताजुद्दीन कला व वाणिज्य महाविद्यालय, ताजाबाद शरीफ, उमरेड रोड, नागपुर येथील विद्यार्थिनी कु. रोझी फातिमा हिने प्रथम पारितोषिक प्राप्त करून महाविद्यालयाचा गौरव वाढविला. यास्पर्धेत विविध महाविद्यालयां तील विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. हजरत बाबा ताजुद्दीन कला व वाणिज्य महाविद्यालया च्यावतीने कु. रोझी फातिमा हिच्यासह कु. झीनत फिरदौस, कु. आलिया नूर, कु. अदीबा खान आणि कु. अनमिता कौसर या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. सर्व विद्यार्थिनींनी आपल्या कलात्मक कौशल्याचे प्रदर्शन करीत महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. त्यामध्ये कु. रोझी फातिमा हिने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवून विशेष यश संपादन केले. या उल्लेखनीय यशाबद्दल शादाब एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अब्दुल सलीम अब्दुल जब्बार, व सचिव मोहम्मद शादाब अब्दुल सलीम आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शकील सत्तार यांनी कु. रोझी फातिमा तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थिनींच्या यशाचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे, सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे आणि विविध सांस्कृतिक व सहशैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे, हे महाविद्यालयाचे उद्दिष्ट आहे. कु. रोझी फातिमा हिने मिळविलेले हे यश महाविद्यालयासाठी अभिमानास्पद असून, इतर विद्यार्थ्यांनाही विविध कला व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल.

# 'सेवा संकल्पा'ला गती, महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांचा लाभार्थ्यांशी थेट संवाद!

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सेवा संकल्प अभियान हे केवळ महिन्याभरापुरते मर्यादित न राहता त्यातील गतिमानता आणि ग्राहकाभिमुख सेवेची संस्कृती महावितरणच्या प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने कायमस्वरूपी अंगीकारावी, असे प्रतिपादन मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी शुक्रवारी (दि. १६) केले. या अभियानात प्रत्येक तालुक्यात एकाच ठिकाणी सर्व ग्राहकसेवा व विविध योजनेतील सहभागाची सुविधा उपलब्ध होत आहे. त्याचा वीजग्राहकांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे लोकेश चंद्र यांनी कल्याण, चंद्रपूर, नाशिक, कोल्हापूर, भांडूप व पुणे येथील विशेष सेवा कक्षांशी थेट संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध




योजनांच्या लाभार्थ्यांशी थेट संवाद साधत प्रतिक्रिया जाणून घेतल्या. या अभियानाला वीजग्राहकांकडून मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद तसेच महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची अभियानातील गतिमानता कौतुकास्पद असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. यावेळी संचालक (संचालन) धनंजय औंढेकर, ग्रामीण विद्युतीकरण कॉरपोरेशनचे कार्यकारी संचालक सौम्या कांत, महावितरणचे कार्यकारी संचालक परेश भागवत व चंद्रमणी मिश्रा यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक व घटनात्मक पदावरील २५ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त महावितरणकडून प्रत्येक तालुक्यात विशेष सेवा कक्ष उभारून येत्या १७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाबाबत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी प्रातिनिधिक स्वरूपात काही परिमंडलांचा आढावा घेतला. यावेळी पीएम सूर्यघर मोफत वीज योजना, मागेल त्याला सौर कृषिपंप, नवीन वीजजोडणी, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट) योजनेचे प्रातिनिधिक लाभार्थी सुशील जयप्रकाश पाटील (नवापूर, विरार), गजराबाई सुला वरडे (नाशिक शहर), आनंद सरदेशमुख (पुणे शहर), धीरज पत्रू नैताम (तळोदी, ता. चामोर्शी, जि. चंद्रपूर), गजानन घाग व बाळासाहेब नदाफ (कोल्हापूर शहर), सुनील रामभाऊ बरड (सावरोली, ता. खालापूर, जि. रायगड) तसेच बँक प्रतिनिधींशी थेट संवाद साधला. महावितरणच्या विशेष सेवा कक्षांद्वारे केलेल्या अर्जांवर तात्काळ कार्यवाही झाली. बॅंक प्रतिनिधी त्याच ठिकाणी असल्याने कर्जाची जागवेरच सोय झाली आणि योजनेचा लाभ मिळाला असे मनोगत लाभार्थ्यांनी व्यक्त केले.

मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले, की येत्या मार्चपर्यंत स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट) योजने अंतर्गत राज्यातील दारिद्रेरेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल ५ लाख घरगुती वीजग्राहकांच्या छतावर एक किलोवॅटचा सौर प्रकल्प कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट साध्य करायचे आहे. स्मार्ट योजनेनुसार दारिद्र्यरेषेखालील ग्राहकांना केंद्र सरकारकडून ३० हजार रुपये तर राज्य सरकारकडून १७ हजार ५०० रुपये अनुदान देण्यात येत आहे. तर शंभर युनिटपेक्षा कमी वीज वापर असणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल ग्राहकांनाही केंद्र सरकारच्या ३० हजार रुपये अनुदानासोबतच राज्य सरकारकडून दहा हजार रुपये अनुदान आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या ग्राहकांना राज्य सरकार १५ हजार रुपये अनुदान देणार आहे. ऊर्वरित रक्कम भरून स्मार्ट योजनेचे लाभार्थी सुमारे २५ वर्षे मोफत विजेचा लाभ घेऊ शकणार असल्याचे लोकेश चंद्र यांनी सांगितले.

या संवाद कार्यक्रमाला मुख्य अभियंते पंकज तगलपल्लेवार (मुख्यालय), सुंदर लटपटे (नाशिक), हरिश गजबे (चंद्रपूर), संजय पाटील (भांडूप), स्वप्निल काटकर (कोल्हापूर), ज्ञानदेव पडळकर (प्रभारी-पुणे), रवींद्र आव्हाड (प्रभारी-कल्याण) आदींसह वरिष्ठ अभियंते, अधिकारी, बँक प्रतिनिधी तसेच वीजग्राहक व लाभार्थ्यांची उपस्थिती होती.

दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : शनिवार, १७ ऑक्टोबर २०२६

थोडक्यात

## हॉटेलमध्ये मुक्काम करणाऱ्या पाहुण्यांना मिळणार १० लाखांचे विमा सुरक्षा कवच!



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

हॉटेलमध्ये वास्तव्यास असलेल्या पाहुण्यांना अपघाती प्रसंगी आर्थिक संरक्षण मिळावे, यासाठी नागपूर रेसिडेन्शियल हॉटेल असोसिएशन आणि दि न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने गेस्ट ट्रान्झिट स्टे इन्शुरन्स योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पात्र पाहुण्यांना प्रतिव्यक्ती प्रतिदिन केवळ ५ रुपये अधिक जीएसटी प्रीमियममध्ये अपघाती मृत्यू किंवा कायमस्वरूपी अपंगत्वासाठी १० लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण मिळू शकते.

असोसिएशनचे अध्यक्ष तेजंदीर सिंग रेणू यांनी पाहुण्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट केले. तर न्यू इंडिया इन्शुरन्सचे प्रादेशिक व्यवस्थापक आर. सुरेशबाबू यांनी योजनेचे स्वरूप, अटी-शर्ती आणि विमा दावा प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे हॉटेलमध्ये वास्तव्यास येणाऱ्या पात्र ग्राहकांना अल्प खर्चात अतिरिक्त आर्थिक सुरक्षा उपलब्ध होणार असून, हॉटेल उद्योगात ग्राहकांच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढण्यास मदत होणार आहे.

## हिंदी माध्यमाच्या शिक्षक संवर्गाचा स्वतंत्र रोस्टर तयार करण्याबाबत शासनस्तरावर मार्गदर्शनाची प्रतीक्षा!

**नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाचे गोंदिया जिल्हा परिषद शिक्षण विभागाला पत्र; हिंदी माध्यमाच्या शिक्षक भरतीतील संभ्रम दूर होण्याची अपेक्षा**

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे- सालेकसा**

गोंदिया जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या प्राथमिक अंतर्गत कार्यरत माध्यमिक शाळांमधील हिंदी माध्यमाच्या शिक्षक संवगार्चा रोस्टर स्वतंत्र ठेवावा की एकत्रित करावा, याबाबत शासनस्तरावरून मार्गदर्शन मिळाल्यानंतरच पुढील कार्यवाही करावी, असे निर्देश नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाने दिले आहेत. यामुळे हिंदी माध्यमाच्या पात्र शिक्षक उमेदवारांचे लक्ष आता शासनाच्या निर्णयाकडे लागले आहे. नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मागासवर्ग कक्षाने १५ ऑक्टोबर २०२६ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद गोंदिया यांना यासंदर्भात पत्र पाठविले आहे.

**नेमके प्रकरण काय?**

गोंदिया जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या प्राथमिक अंतर्गत कार्यरत माध्यमिक शाळांमधील हिंदी माध्यमाच्या शिक्षक संवगार्चा रोस्टर स्वतंत्र ठेवण्याबाबत मार्गदर्शन मागविण्यात आले होते. यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडे अभिप्राय मागविण्यात आला होता. मात्र, संबंधित प्रकरण शासनाच्या शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आल्याचे विभागीय आयुक्त कार्यालयाने स्पष्ट केले आहे. शासनाकडून अद्याप या कार्यालयाला अंतिम मार्गदर्शन प्राप्त झालेले नसल्याने, शासनस्तरावरून मार्गदर्शन मिळाल्यानंतरच नियमानुसार रोस्टरची तपासणी करून पुढील कार्यवाही करता येईल, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

**हिंदी माध्यमाच्या उमेदवारांना न्याय मिळणार का?**

हिंदी माध्यमाच्या शिक्षक संवगार्चा रोस्टर स्वतंत्र ठेवायचा की एकत्रित करायचा, हा प्रश्न शिक्षक भरती प्रक्रियेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. रोस्टरच्या स्वरूपावर आरक्षणाची पदनिहाय निश्चिती आणि पात्र उमेदवारांच्या संधींचा प्रश्न अवलंबून असू शकतो. त्यामुळे या प्रकरणात शासनाने स्पष्ट आणि नियमानुसार मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. राजेश्वरी मानवदास बसोना, मु.पो. कहाली, ता. सालेकसा, जि. गोंदिया यांना या पत्राची प्रत पाठविण्यात आली आहे.

**शासनाच्या निर्णयाकडे लक्ष!**

हिंदी माध्यमाच्या शिक्षक संवर्गाच्या रोस्टरबाबत शासनाने लवकरात लवकर स्पष्ट भूमिका घ्यावी, जेणेकरून भरती प्रक्रियेतील संभ्रम दूर होऊन पात्र उमेदवारांना नियमानुसार न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आता प्रतीक्षा आहे ती शासनाच्या स्पष्ट मार्गदर्शनाची आणि त्यानंतर होणाऱ्या पुढील कार्यवाहीची!

## 'महिलांची प्रगती आणि मर्यादा' विषयावर परिसंवाद संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आर. एस. मुंडले धरमपेठ कला आणि वाणिज्य महाविद्यालय, नागपूर येथील महिला विकास कक्ष आणि विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिलांची प्रगती आणि मर्यादा : दोन्ही महिलांमध्येच' या विषयावर परिसंवाद पार पडला. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त तसेच वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख वक्त्या अनघा सराफ यांनी बँकिंगविषयक ज्ञान, आर्थिक व्यवहारांतील जागरूकता आणि आत्मविश्वास यांच्या बळावर महिलांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करावी. आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन जीवनातील निर्णय स्वतः घेण्याची क्षमता विकसित करावी, असे आवाहन केले.

ज्वाला धोटे यांनी भारतीय स्त्रीने पारंपरिक मर्यादा ओलांडून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केल्याचे सांगितले. महिलांनी आपल्या क्षमतांची जाणीव ठेवून उपलब्ध संधींचा लाभ घ्यावा, असे त्या म्हणाल्या. रजनी हुट्टा यांनी महिलांची प्रगती, सामाजिक मयार्दा, सांस्कृतिक मूल्ये आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या या विषयांवर विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ. मंजुश्री सरदेशपांडे यांनी परिसंवादाचे सूत्र सांभाळत महिलांनी व्यावसायिक आणि वैयक्तिक जीवनात समतोल राखण्याच्या गरजेवर भर दिला. कार्यक्रमाला अरुणा सबाने, माधुरी साकुळकर यांची उपस्थिती होती. विदर्भ साहित्य संघाच्या वतीने पुस्तके भेट देऊन वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यात आले. शेवटी सौ शुभदा फडणवीस यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# दीक्षाभूमीवरील धम्मचक्र प्रवर्तन दिनाची तयारी अंतिम टप्प्यात

**महापौर निता ठाकरे यांनी केली मनपाच्या व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी, मनपाद्वारे आरोग्य, पाणी, स्वच्छता, निवारा, परिवहन सुविधांची व्यवस्था**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर देश-विदेशातून लाखो अनुयायी दाखल होत असतात. अनुयायांची कोणतीही गैरसोय होऊ नये आणि त्यांना उत्तम व सुखकर सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी नागपूर महानगरपालिकेद्वारा करण्यात येणारी तयारी अंतिम टप्प्यात आहे. मनपाद्वारे प्रदान केल्या जाणाऱ्या विविध सोयीसुविधांची महापौर श्रीमती निता ठाकरे यांनी शुक्रवारी (ता.१६) दीक्षाभूमी परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली.

पाहणी दौऱ्यात मनपा आयुक्त डॉ. विपीन, उपमहापौर लीला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, परिवहन समिती सभापती मंगला खेकरे, लक्ष्मीनगर झोन सभापती तारा(लक्ष्मी) यादव, धरमपेठ झोन सभापती धनश्री देशपांडे, यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महापौर निता ठाकरे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर येणाऱ्या अनुयायांसाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे सर्व नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहेत. यात निवाऱ्याची व्यवस्था, २४ तास पाणी पुरवठा, दिवसरात्र सफाई कामगार, अनुयायांना मार्गदर्शन करण्यासाठी नियंत्रण कक्ष तैनात केले जाणार आहेत. मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी संपूर्ण व्यवस्थेचा आढावा घेऊन घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, अग्निशमन व कायदा सुव्यवस्था चांगली राहील, या चार प्रमुख बाबींवर अधिकारी व कर्मचार्यांनी विशेष लक्ष द्यावे तसेच मुलभूत सुविधांमध्ये त्रुटी राहू नयेत याची काळजी घेण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत.

**१२०० सफाई कर्मचाऱ्यांची सेवा, १४० नळांची व्यवस्था**

दीक्षाभूमी परिसरामध्ये सतत स्वच्छता राखली जाईल यासाठी ठिकठिकाणी कचरा कुंड्यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. शिवाय तीन पाळीमध्ये एकूण १२०० स्वच्छता कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. दीक्षाभूमी मार्गावर पिण्याच्या शुद्ध पाण्यासाठी १४० नळांची व्यवस्था करण्यात आली आहे. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय), दीक्षाभूमी, पीकेव्ही, कुर्वेज हायस्कूल, बेझनबाग, अंबाझरी, व उंटखाना येथे २१ हजार व्यक्तींच्या निवाऱ्याची निर्मिती करण्यात आली आहे. याशिवाय आपात्कालीन स्थितीमध्ये दीक्षाभूमी जवळील शाळांमध्ये निवारा व्यवस्था करण्यात येणार आहे.

**आरोग्य सेवा २४ तास**

दीक्षाभूमी येथील मुख्य मार्गावर आरोग्य तपासणी केंद्राची व्यवस्था केली आहे. याशिवाय डॉक्टरांचे पथक राहणार आहे. त्याचप्रमाणे रुग्णवाहिका २४ तास उपलब्ध राहणार आहे. काचीपुरा पोलीस चौकी, बजाजनगर पोलीस चौकी, लक्ष्मीनगर चौक, काँग्रेस नगर, ड्रॅगन पॅलनेस व चोखामेळा वसतिगृह जवळ फिरत्या दवाखान्याची सुविधा राहणार आहे. या केंद्रातील सर्व कर्मचार्यांची फोन क्रमांक सर्वांना शेअर केले जाणार आहे.

**आकस्मिक काळात मनपाच्या शाळा**

अचानक पाऊस आल्यास अनुयायांना थांबण्यासाठी मनपाच्या शाळांमध्ये व्यवस्था केली जाणार आहे. यासाठी १८ ते २२ ऑक्टोबरपर्यंत मनपाच्या शाळ उपलब्ध राहणार आहे. दीक्षाभूमीवरील व्यवस्थेची माहिती देण्यासाठी प्रमुख चौकांमध्ये एलईडी स्क्रीन लावण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे प्रमुख चौक, बस स्थानक रेल्वे स्टेशनमध्ये मार्गदर्शक सूचना देणारे मोठे फलक लावण्यात येईल.

**कचरा रस्त्यावर नव्हे, कचराकुंडीतच टाका**

दीक्षाभूमीवर येणाऱ्या सर्व बौद्ध अनुयायांना सुविधा प्रदान करण्यासाठी मनपाची संपूर्ण यंत्रणा सज्ज झालेली आहे. दीक्षाभूमीवर येणाऱ्या सर्व नागरिकांनी या सुविधांचा लाभ घ्यावा. नागरिकांनी प्लास्टिक वस्तूंचा वापर टाळावा. परिसरात स्वच्छतेसाठी स्वच्छता कर्मचारी सेवारत राहणार आहेत. नागरिकांनी देखील आपली जबाबदारी ओळखून कुठेही कचरा होणार नाही याची काळजी घ्यावी. रस्त्यावर अथवा इतरत्र कुठेही कचरा न टाकता तो परिसरातील कचरा कुंडीमध्येच टाकावे व मनपा प्रशासनाला सहकार्य करावे, आवाहन मनपाद्वारे करण्यात आले आहे.

## दिवाळी सुट्ट्यांच्या काळात प्रशिक्षणाचे नियोजन, शिक्षकांमध्ये नाराजीची भावना, १३ नोव्हेंबरपासून प्रशिक्षण सुरू होण्याची शक्यता

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**




राज्यातील शिक्षकांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या निवड श्रेणी व वरिष्ठ श्रेणी प्रशिक्षणामुळे शिक्षकांना यंदाच्या दिवाळीच्या सुट्ट्यांपासून मुकावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हे प्रशिक्षण १३ नोव्हेंबर पासून सुरू होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. शैक्षणिक वर्षभर विद्यार्थ्यांना शिकविण्याची जबाबदारी पार पाडल्यानंतर दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये कुटुंबासोबत वेळ घालविण्याची आणि वैयक्तिक कामे पूर्ण करण्याची शिक्षकांना अपेक्षा असते. मात्र, सुट्ट्यांच्या कालावधीत प्रशिक्षणाचे आयोजन झाल्यास शिक्षकांच्या सुट्ट्यांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

**सुट्ट्यांमध्ये प्रशिक्षणाचे नियोजन का?**

शिक्षकांना सेवाज्येष्ठतेनुसार आणि नियमानुसार निवड श्रेणी व वरिष्ठ श्रेणीचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण पूर्ण करावे लागते. या प्रशिक्षणाचा उद्देश शिक्षकांची व्यावसायिक क्षमता वाढविणे आणि शैक्षणिक गुणवत्ता सुधारणे हा आहे. मात्र, प्रशिक्षणाचे वेळापत्रक निश्चित करताना शाळांच्या सुट्ट्या आणि शिक्षकांच्या वैयक्तिक अडचणींचाही विचार करणे आवश्यक असल्याचे शिक्षकांकडून सांगितले जात आहे.

**शिक्षकांच्या विश्रांतीचा विचार होणार का?**

शिक्षकांचे काम केवळ वर्गात अध्यापन करण्यापुरते मर्यादित नसते. विद्यार्थ्यांच्या परीक्षा, निकाल, विविध शालेय उपक्रम, शैक्षणिक नोंदी आणि इतर प्रशासकीय कामांमध्ये शिक्षकांचा मोठा वेळ खर्च होतो. त्यामुळे दिवाळीच्या सुट्ट्या हा शिक्षकांसाठी विश्रांतीचा आणि कुटुंबीयांसोबत वेळ घालविण्याचा महत्त्वाचा कालावधी असतो.

अशा परिस्थितीत सुट्ट्यांच्या काळात प्रशिक्षण आयोजित केल्यास शिक्षकांना मानसिक व शारीरिक विश्रांती मिळण्यावर परिणाम होऊ शकतो. प्रशिक्षणाची आवश्यकता मान्य असली, तरी त्यासाठी सुट्ट्यांचाच कालावधी निवडण्याऐवजी पर्यायी वेळापत्रक तयार करावे, अशी अपेक्षा शिक्षकांकडून व्यक्त केली जाऊ शकते.

**प्रशिक्षणासाठी पर्यायी वेळापत्रक तयार करण्याची मागणी**

निवड श्रेणी व वरिष्ठ श्रेणी प्रशिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन शिक्षण विभागाने प्रशिक्षणाचे नियोजन करताना शिक्षकांच्या सुट्ट्यांचा विचार करावा. प्रशिक्षणाचे आयोजन शैक्षणिक कामकाजावर आणि शिक्षकांच्या वैयक्तिक जीवनावर कमीत कमी परिणाम होईल अशा पद्धतीने करावे, अशी मागणी पुढे येत आहे.

शिक्षकांना प्रशिक्षणाची संधी मिळणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्यांना नियोजित सुट्ट्यांचा लाभ मिळणेही महत्त्वाचे आहे. त्यामुळे शिक्षण विभाग याबाबत कोणता निर्णय घेतो आणि शिक्षकांच्या अडचणींचा विचार केला जातो का, याकडे संबंधित शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

## गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवांतून आरोग्यसंपन्न गावांची निर्मिती करावी : धनंजय साळवे

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे**



ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे. प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि जनजागृतीच्या माध्यमातून प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न बनवावे, असे आवाहन पंचायत समिती बल्लारपूरचे गटविकास अधिकारी धनंजय साळवे यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या 'माझं गाव आरोग्यसंपन्न गाव' अभियानांतर्गत पंचायत समिती बल्लारपूर व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑक्टोबर रोजी राजे खांडक्या बल्लाळशहा सभागृहात मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेचे उद्घाटन तहसीलदार रेणुका कोकाटे यांच्या हस्ते झाले. यावेळी आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी, माता-बाल आरोग्य, कुपोषण निर्मूलन, आजारांचे वेळीच निदान आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर मार्गदर्शन करण्यात आले. अभियानातील मागील सहा महिन्यांच्या कामकाजाचा आढावा घेऊन आरोग्य सेवा अधिक प्रभावी करण्याबाबत चर्चा झाली.

कार्यशाळेला तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कुणाल मोडक, वैद्यकीय अधिकारी, विस्तार अधिकारी, सरपंच, आशा स्वयंसेविका तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक साहेबराव पवार यांनी केले, सूत्रसंचालन सतीश कौरासे यांनी केले, तर स्वाती गोलपेलवार यांनी आभार मानले.

## निसर्गायण मंडळातर्फे 'आहार, विचार' वर १८ ऑक्टोबर रोजी कार्यक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

निसर्गायण मंडळ, नागपूर यांच्यावतीने 'आरोग्याच्या सर्व समस्यांची मुळे... आहार, विचार...' या विषयावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन रविवार, १८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता बजाज नगर येथील कस्तुरबा भवनातील रंगमंडप येथे होणार आहे. या कार्यक्रमात आहार तज्ज्ञ रविकिरण महाजन मार्गदर्शन करणार आहेत.

शरीर आणि मन यांचा आरोग्याशी असलेला संबंध, जीवनातील ताणतणावांचा आरोग्यावर होणारा परिणाम, आहारातील अनियमितता आणि अनियंत्रित विचारांचा पचनसंस्थेवर होणारा परिणाम, तसेच रोगप्रतिकारशक्तीचे महत्त्व, आयुर्वेद आणि नैसर्गिक उपचारांच्या माध्यमातून आरोग्यविषयक समस्यांवर उपाय यांसारख्या विषयांवर या कार्यक्रमात चर्चा होणार आहे. मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## बल्लारपूरमध्ये ५४ वे तालुकास्तरीय बाल विज्ञान प्रदर्शन संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे**



विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासह संशोधनवृत्ती, सर्जनशीलता आणि नावीन्यपूर्ण कल्पनांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने शिक्षण विभाग, पंचायत समिती बल्लारपूर यांच्या वतीने आयोजित ५४ वे तालुकास्तरीय बाल विज्ञान प्रदर्शन १३ ते १५ ऑक्टोबरदरम्यान भालेराव पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, बल्लारपूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध विज्ञान प्रकल्प आणि प्रतिकृती सादर करून आपल्या कल्पकतेचे व वैज्ञानिक दृष्टिकोनाचे दर्शन घडविले.

या विज्ञान प्रदर्शनात उच्च प्राथमिक गटातील इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी २६ प्रतिकृती, तर माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातील इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी १७ प्रतिकृती सादर केल्या. याशिवाय दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सीडब्ल्यूएसएन गटातून सात प्रकल्प, आदिवासी गटातून दोन प्रकल्प सादर करण्यात आले. शिक्षक व परिचर गटातूनही विज्ञान प्रतिकृतींचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जिज्ञासेला चालना देण्यासाठी प्रदर्शनासोबतच वक्तृत्व, प्रश्नमंजुषा आणि निबंध स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले होते.

या प्रदर्शनाचे उद्घाटन तहसीलदार रेणुका कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती बल्लारपूरचे गटविकास अधिकारी धनंजय साळवे होते, तर भालेराव पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सीमा भास्करवार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

गटशिक्षणाधिकारी सचिन कुमार मालवी यांच्या मार्गदर्शनाखाली या विज्ञान प्रदर्शनाचे नियोजन करण्यात आले. यावेळी विस्तार अधिकारी शिक्षण सोबतकौर भोंड (बीट कोठारी), नागेंद्र कुमरे (बीट विसापूर), केंद्रप्रमुख किरण कामडी (केंद्र कोठारी), गटसाधन केंद्रातील सर्व साधन व्यक्ती, विशेष शिक्षक, शिक्षकवृंद तसेच पंचायत समिती बल्लारपूर अंतर्गत विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रदर्शनात विविध स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पांमधून त्यांची कल्पकता, निरीक्षणक्षमता आणि वैज्ञानिक विषयांतील रुची अधोरेखित झाली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यासोबतच संशोधन, प्रयोगशीलता आणि नव्या संकल्पना प्रत्यक्षात आणण्याची प्रेरणा मिळते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माया वाठोरे यांनी केले, तर रूपाली मामीडवार यांनी आभार प्रदर्शन केले. या विज्ञान प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळाला असून, त्यांच्या वैज्ञानिक जिज्ञासेला नवी दिशा देणारा हा उपक्रम ठरला.

# महाज्योती, सारथी, बार्टीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संशोधनासाठी मदत

## काँग्रेसचे अभिजित वंजारी यांनी मांडला सहा वर्षातील लेखाजोखा



**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

पदवीधरांच्या प्रश्नांना प्राधान्य देत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, शैक्षणिक संस्थांचे सक्षमीकरण करणे आणि विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण व संशोधनासाठी आवश्यक सुविधा मिळवून देण्याच्या उद्देशाने गेल्या सहा वर्षांत विविध उपक्रम राबविण्यात आल्याची माहिती नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाचे काँग्रेस व महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजित गोविंदराव वंजारी यांनी दिली. चंद्रपूर शहरात झालेल्या प्रचारसभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी आपल्या कार्यकाळातील कामांची माहिती देताना या उपक्रमांचा आढावा मांडला.

**रोजगार, शिक्षण आणि संशोधनाला प्राधान्य**

विधान परिषदेतील आपल्या कार्यकाळात पदवीधरांच्या रोजगाराचा प्रश्न केंद्रस्थानी ठेवून विविध प्रयत्न केल्याचे वंजारी यांनी सांगितले. गोंदिया, भंडारा यांसह नागपूर विभागातील सहाही जिल्ह्यांमध्ये दरवर्षी रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि नोकरी देणाऱ्या संस्था व रोजगाराच्या शोधात असलेले तरुण यांच्यात समन्वय साधणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.

**ग्रंथालयांचे डिजिटल सक्षमीकरण**

विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक साधनसुविधा उपलब्ध व्हाव्यात, स्पर्धा परीक्षांची तयारी सुलभ व्हावी आणि वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन मिळावे, यासाठी ग्रंथालये तसेच शाळा-महाविद्यालयांमध्ये डिजिटल साधनसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. सार्वजनिक ग्रंथालये आणि शैक्षणिक संस्थांचे डिजिटल सक्षमीकरण हा या कामातील महत्त्वाचा भाग असल्याचे वंजारी यांनी सांगितले.

**संशोधनासाठी आर्थिक मदत आणि शैक्षणिक सुविधा**

उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधनाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने महाज्योती, सारथी आणि बार्टी या संस्थांच्या माध्यमातून पीएच.डी. संशोधनासाठी आर्थिक सहाय्य मिळवून देण्याबाबत पाठपुरावा करण्यात आला. संशोधक विद्यार्थ्यांना आवश्यक मदत मिळावी आणि आर्थिक अडचणींमुळे त्यांचे संशोधन थांबू नये, यासाठी या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यावर भर देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय विद्यार्थ्यांना वसतिगृह सुविधा उपलब्ध करून देणे, दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यक उपकरणे मिळवून देणे आणि शिक्षणाच्या प्रवासात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा करणे, या बाबींनाही प्राधान्य देण्यात आल्याचे वंजारी यांनी सांगितले.

**पदवीधरांच्या प्रश्नांसाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा**

रोजगार, शिक्षण, ग्रंथालयांचे आधुनिकीकरण, संशोधनासाठी आर्थिक सहाय्य आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा या विषयांवर केलेल्या कामांची माहिती अभिजित वंजारी यांनी यावेळी दिली. पदवीधर मतदारसंघातील नागरिक, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्याची भूमिका त्यांनी प्रचारसभेत मांडली.

## प्लॅनेट आयटीतर्फे शिक्षकांसाठी ‘AI Masterclass’, विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाची ओळख करून देणे आणि विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने PLANET iT, सावनेर यांच्या वतीने तालुक्यातील विविध शाळांमध्ये ‘AI Masterclass’ आणि ‘Cyber Security Awareness Session’ आयोजित करण्यात आले. शिक्षकांसाठी आयोजित कार्यशाळेत अक टूल्सचा अध्यापनात प्रभावी वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या सत्रात ऑनलाइन आर्थिक फसवणूक, सोशल मीडियाचा अतिवापर, संशयास्पद लिंक, डळढ व पासवर्डची सुरक्षितता आणि सायबर गुन्ह्यांपासून बचाव करण्याच्या उपायांची माहिती देण्यात आली. क्लिक करण्याआधी विचार करा, सायबर फसवणुकीपासून स्वतःला सुरक्षित ठेवा, असे आवाहन PLANET iT चे अभिषेक सिंह यांनी विद्यार्थ्यांना केले. जवाहर कन्या विद्यालय, सावनेर; भालेराव हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, सावनेर; लोकमान्य विद्यालय, बडेगाव; मोवाडे पब्लिक स्कूल, नांदा; नगर परिषद विद्यालय, सावनेर आणि गोमुख विद्यालय, नांदा-गोमुख येथे हे उपक्रम राबविण्यात आले. शिक्षकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी काजल गहरवार, नेहा ढवंगाळे, नताशा देशमुख, किरण चाफेकर आणि नेहा निंबाळकर यांनी विशेष परिश्रम घेतले. आधुनिक शिक्षणात अक चा प्रभावी वापर आणि विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित डिजिटल वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण

## धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा मुख्य सोहळा मंगळवारी

### भदंत सुरेई ससाई यांची माहिती, दोन दिवस विविध कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय धम्म परिषद, महाबोधी महाविहार प्रकरणाच्या न्यायालयीन स्थितीची अनुयायांना देणार माहिती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

तथागत गौतम बुद्धांच्या धम्माचा संदेश आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऐतिहासिक धम्मक्रांतीच्या स्मृतींना उजाळा देणारा ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा मुख्य सोहळा मंगळवार, २० ऑक्टोबर रोजी सायं. ५.३० वाजता दीक्षाभूमीवर होणार आहे.



यानिमीत्त परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीतर्फेष्ठ १९ आणि २० ऑक्टोबर असे दोन दिवस विविध धार्मिक आणि वैचारिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्य सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्मसेनानायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई राहणार आहेत. या सोहळ्यात महाबोधी महाविहारासंबंधी सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या प्रकरणाची सद्यस्थिती अनुयायांसमोर सविस्तर मांडण्यात येणार आहे. त्याचबरोबर नागपूर सुधार प्रन्यासच्या माध्यमातून सुरू असलेल्या दीक्षाभूमीच्या सौंदर्यीकरणाच्या कामाची माहितीही देण्यात येणार असल्याचे भदंत ससाई यांनी सांगितले.

मुख्य सोहळ्याला सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता ॲड. शैलेश नारनवरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. म्यानमारचे भदंत वन्ना सिरी महाथेरो, दिल्लीचे भंते करुणाकरण आणि बेंगळुरूचे जिग्मे सुल्ट्रीम महाथेरो विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहतील. महाबोधी महाविहाराचे प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. या प्रकरणाची बाजू ॲड. शैलेश नारनवरे मांडत असून, त्यांना प्रकरणाची इत्यंभूत माहिती आहे. मुख्य सोहळ्यात ॲड. नारनवरे हे महाबोधी महाविहार प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयातील सद्यस्थिती तसेच पुढील न्यायालयीन प्रक्रियेबाबत उपस्थित अनुयायांना सविस्तर माहिती देतील, असे भदंत ससाई यांनी सांगितले.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दरवर्षी देश-विदेशातून मोठ्या संख्येने बौद्ध अनुयायी दीक्षाभूमीवर येतात. यंदाही दोन दिवस दीक्षाभूमीवर विविध धार्मिक आणि वैचारिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार असून, देश-विदेशातील भंते आणि अनुयायांची उपस्थिती राहणार आहे.

### सोमवारी आंतरराष्ट्रीय धम्म परिषद

सोमवार, १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या प्रमुख उपस्थितीत धम्म ध्वजारोहणाने धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या कार्यक्रमांना सुरुवात होईल. त्यानंतर बुध्द वंदना घेण्यात येईल. सायंकाळी ६ वाजता दीक्षाभूमीवर आंतरराष्ट्रीय धम्म परिषद आयोजित करण्यात आली आहे. परिषदेला देश-विदेशातील भंते उपस्थित राहणार असून, बुद्ध धम्माच्या विविध पैलूंवर विचारमंथन केले जाईल. तथागत गौतम बुद्धांचा धम्मसंदेश आणि वर्तमानकाळातील त्याची प्रासंगिकता यावरही मान्यवर आपले विचार मांडणार आहेत.

## धापेवाडा टेक्सटाईलचे आज उद्घाटन

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व अभिनेत्री हेमा मालिनी यांची प्रमुख उपस्थिती





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भाच्या पारंपरिक हातमाग उद्योगाला आधुनिकतेची जोड देणाऱ्या महत्त्वाकांक्षी धापेवाडा टेक्सटाईल प्रकल्पाचा शुभारंभ शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता धापेवाडा (कळमेश्वर), नागपूर येथे होणार आहे. या सोहळ्यात धापेवाडा टेक्सटाईल उद्योग प्रोड्यूसर कंपनी लिमिटेडच्या नूतन इमारतीचे लोकार्पण आणि धापेवाड्यातील हातमाग साड्यांचा विशेष फॅशन शो हे या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण राहणार आहे.

केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व राष्ट्रीय महामार्ग मंत्री तथा या प्रकल्पाचे मार्गदर्शक नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या प्रकल्पाचे उद्घाटन सुप्रसिद्ध अभिनेत्री व खासदार हेमा मालिनी यांच्या हस्ते होईल.

या कार्यक्रमाला केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह, महाराष्ट्राचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि महाराष्ट्राचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

## महिषासुरमर्दिनी स्तोत्र पठण स्पर्धेत ४७ मंडळांचा सहभाग

### महिला शक्तीचा जागर! भक्तिमय वातावरणात ५०० हून अधिक महिलांचे सामूहिक स्तोत्र पठण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्त्रीशक्तीचा उत्स्फूर्त सहभाग, देवीभक्तीचा भावपूर्ण आविष्कार आणि भारतीय संस्कृतीच्या परंपरांचे दर्शन अशा भक्तिमय वातावरणात महिषासुरमर्दिनी स्तोत्र पठण स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. विश्व हिंदू परिषद, मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयाम, नागपूर महानगर आणि आग्याराम देवी मंदिर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, १५ ऑक्टोबर २०२६ रोजी गणेश पेठ येथील आग्याराम देवी मंदिरात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ४७ मंडळांतील ५०० हून अधिक महिलांनी सहभाग घेतला.



महिलांमध्ये धार्मिक संस्कार रुजविणे, स्तोत्र पठणाची आवड निर्माण करणे आणि भारतीय संस्कृती व परंपरांविषयी जागरूकता वाढविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. स्पर्धेचे हे दुसरे वर्ष असून, यंदाही महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. देवीच्या स्तुतिपर महिषासुरमर्दिनी स्तोत्राच्या सामूहिक पठणामुळे मंदिर परिसरात भक्ती, श्रद्धा आणि चैतन्यपूर्ण वातावरण निर्माण झाले. विविध मंडळांच्या सादरीकरणातून महिलांची धार्मिक निष्ठा, सामूहिक साधना आणि सांस्कृतिक परंपरांप्रती असलेली आस्था प्रकर्षाने दिसून आली.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी आग्याराम देवी मंदिर ट्रस्टचे गिरीशजी व्यास यांनी आग्याराम देवी मंदिराची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी विनोद आष्टीकर, वासुदेव नागपुरे, विजय चौबे आणि चैताली खटी यांची प्रमुख उपस्थिती होती. अनिलजी सांबरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन श्रद्धा पाठक यांनी केले, तर सारिका येवले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. स्पर्धेचे परीक्षण अश्विनी काणे, विशाखा पाध्ये आणि सपना खांडवे यांनी केले.

**स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आला.**

प्रथम क्रमांक : गुरुप्रसाद भजन मंडळ, मानेवाडा

द्वितीय क्रमांक : गुरुमाऊली भजन मंडळ

तृतीय क्रमांक : पिंगळाई भजन मंडळ

उत्तेजनार्थ पुरस्कार : कनक सुर मंदिर, लक्ष्मीनारायण भजन मंडळ, श्री जगदंबा भजन मंडळ, महाल आणि आदिशक्ती भजन मंडळ.

या स्पर्धेच्या आयोजनासाठी प्रतापनगर येथील दुर्गा मंदिर, गोरक्षण; जयप्रकाशनगर येथील श्री महालक्ष्मी मंदिर; तसेच तपोवन, सोमलवाडा येथील श्री गजानन मंदिर यांनी मोलाचे सहकार्य केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी चैताली खटी, श्रद्धा पाठक, सारिका येवले, ममता चिंचवडकर, वासुदेवराव नागपुरे, विजय चौबे, प्रशांत जोशी, जयश्री गभने आणि रश्मी भुमराळकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

महिलांच्या सामूहिक सहभागातून शक्ती उपासनेची परंपरा अधिक व्यापक करणे, नव्या पिढीपर्यंत धार्मिक संस्कार पोहोचविणे आणि समाजातील सांस्कृतिक एकात्मता दृढ करणे, या दृष्टीने ही स्पर्धा महत्त्वपूर्ण ठरली. महिषासुरमर्दिनी स्तोत्राच्या सामूहिक पठणातून महिला शक्तीचा जागर घडविणारा हा उपक्रम धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांच्या जतनासाठी प्रेरणादायी ठरला.

## थोडक्यात

### ज्ञान, विवेक, चारित्र्य आणि प्रामाणिकपणा हीच खरी संपत्ती : विलास काळे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

'संपत्ती म्हणजे केवळ भौतिक वस्तू नव्हे, तर ज्ञान, योग्य निर्णयक्षमता, चारित्र्य आणि प्रामाणिकपणा हीच जीवनातील खरी संपत्ती आहे,' असे प्रतिपादन उद्योजक आणि लेखक विलास काळे यांनी केले. विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशनतर्फे अलीकडेच



चिटणवीस सेंटर येथे 'वेल्थ, विस्डम अँड द आर्ट ऑफ लिव्हिंग' या विषयावर आयोजित सत्रात ते बोलत होते. व्यवसायातील अनुभव, व्यावहारिक उदाहरणे आणि तात्त्विक विचारांच्या आधारे काळे यांनी संपत्ती, विवेक आणि अर्थपूर्ण जीवन जगण्याच्या कलेचे महत्त्व विशद केले. जमीन, इमारती, गुंतवणूक, रोख रक्कम, सोने इत्यादि वस्तु या सुखकर जीवनासाठी आवश्यक असल्या, तरी चारित्र्य आणि प्रामाणिकपणाचे मूल्य अधिक असल्याचे त्यांनी सांगितले. केवळ पैसा कमावण्यासाठी धडपडण्याच्या वृत्तीमुळे आरोग्य आणि जीवनातील साध्या आनंदांकडे दुर्लक्ष होऊ शकते, असा इशाराही त्यांनी दिला. संपत्ती कमावण्याचे उद्दिष्ट जितके महत्त्वाचे आहे, तितकीच ती कमावण्याची पद्धतही महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

संस्कृत श्लोकांचा संदर्भ देत काळे यांनी लोकांचे तीन प्रकार सांगितले. काही जण केवळ पैसा मिळवण्याला महत्त्व देतात, काहींना पैसा आणि प्रतिष्ठा दोन्ही हवी असते, तर काही जण प्रतिष्ठेला सर्वाधिक महत्त्व देतात. संपत्ती कमावणे, समाजात आदर मिळवणे आणि त्याच वेळी आनंदी व शांत राहणे, यातच खरा विवेक असल्याचे त्यांनी सांगितले. चाणक्याच्या विचारांचा संदर्भ देत त्यांनी गरज पडल्यास मदत मागण्यास संकोच करू नये, इतरांविषयी मनात द्वेष बाळगू नये आणि पैसा कमावण्यामागील उद्देश समजून घ्यावा, असे आवाहन केले. जीवन जगण्याच्या कलेविषयी बोलताना काळे यांनी स्वीकारभावना हा त्याचा पाया असल्याचे सांगितले. आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यापूर्वी स्वतःला आणि आपल्या परिस्थितीला समजून घेणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले. क्षमाशीलता, प्रेम आणि करुणा ही जीवनातील महत्त्वाची मूल्ये असून, अपेक्षांचे योग्य व्यवस्थापन करणेही तितकेच गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. इतरांसाठी सतत काहीतरी करताना स्वतःच्या आरोग्याकडे आणि कल्याणाकडे दुर्लक्ष करून स्वतःला थकवून घेऊ नये, असा सल्लाही त्यांनी दिला. परमशक्तीवरील श्रद्धा आणि दुःखासमोर हार न मानण्याचा दृढनिश्चय यांमुळे संतुलित आणि समाधानकारक जीवन जगता येते, असे त्यांनी स्पष्ट केले. या सत्राचे संचालन डॉ. रश्मी बन्सल यांनी केले, तर विनायक गवानकर यांनी मंथन सत्राचे सूत्रधार म्हणून भूमिका बजावली. यापूर्वी झालेल्या मंथन या संक्षिप्त सत्रात आलोक धोटेकर यांनी ऑर्गनोग्राम आणि के-मॅप या विषयावर मार्गदर्शन केले.

### डॉ. कुणाल देऊस्कर उलगडणार 'नागपूर ते न्यूट्रिनो' प्रवास

#### संशोधन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ५ नोव्हेंबरला विशेष संवाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरचे मूळ रहिवासी असलेले डॉ. कुणाल देऊस्कर हे आइसक्यूब न्यूट्रिनो वेधशाळेच्या संशोधन समूहाशी संबंधित संशोधक आहेत.



यंदाचा भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार प्राप्त करणारे प्रा. फ्रान्सिस हॅल्झेन यांच्या नेतृत्वाखालील वैज्ञानिक समूहातही त्यांचा सहभाग होता. डॉ. देऊस्कर यांचा 'नागपूर ते न्यूट्रिनो : आइसक्यूब न्यूट्रिनो वेधशाळेसोबतचे संशोधन' या विषयावरील विशेष संवाद ५ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता नागपुरातील चिटणवीस सेंटर येथे आयोजित करण्यात आला आहे. आयआयटी खरगपूर येथून भौतिकशास्त्राचे शिक्षण घेतल्यानंतर डॉ. देऊस्कर यांनी २०२२ मध्ये स्टॉकहोम विद्यापीठातून पीएच.डी. संपादन केली. त्यांच्या डॉक्टरेट संशोधनाचा मुख्य विषय गॅमा-किरणांच्या स्फोटांतून उत्सर्जित होणाऱ्या न्यूट्रिनोचा आइसक्यूब वेधशाळेतील माहितीच्या आधारे शोध घेणे हा होता. आइसक्यूब संशोधन समूहाचा भाग म्हणून त्यांनी प्रा. हॅल्झेन यांच्यासोबत २५० हून अधिक संशोधन लेखांचे सहलेखन केले आहे. अंटार्क्टिकामधील दक्षिण ध्रुवाजवळ बर्फाच्या खोल थरांमध्ये उभारलेली आइसक्यूब न्यूट्रिनो वेधशाळा अवकाशातून येणा?या न्यूट्रिनोचा शोध घेते. या निरीक्षणांच्या माध्यमातून विश्वातील अत्यंत ऊर्जावान घटनांचा अभ्यास केला जातो. या वेधशाळेचे कार्य, तिच्या संशोधनाची प्रक्रिया आणि विश्वातील रहस्यांचा शोध घेण्यासाठी सुरू असलेल्या वैज्ञानिक प्रयत्नांविषयी डॉ. देऊस्कर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

सध्या डॉ. देऊस्कर हे स्टॉकहोम येथील भौतिकशास्त्रावर केंद्रित असलेल्या 'सॅव्हँटिक एआय लॅब' या डेटा सायन्स कंपनीमध्ये कार्यरत आहेत. भौतिकशास्त्र, खगोलशास्त्र आणि वैज्ञानिक संशोधन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना या सत्रातून मोलाचे मार्गदर्शन मिळणार आहे. विद्यार्थी, युवा संशोधक, शिक्षक आणि विज्ञानप्रेमींनी या माहितीपूर्ण संवादात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### मराठवाड्यातून थेट गाठता येणार नागपूर, धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विशेष रेल्वेगाड्या

**अकोला :** नागपूर येथे २० ऑक्टोबर रोजी आयोजित धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्यास उपस्थित राहणाऱ्या प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने नांदेड-नागपूर-नांदेड आणि जालना-नागपूर-जालना दरम्यान विशेष रेल्वेगाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. गाडी क्रमांक ०७०८५ नांदेड - नागपूर विशेष १९ ऑक्टोबर सोमवार रोजी नांदेड येथून रात्री २०.०० वाजता सुटेल. मुदखेड, भोकर, हिमायतनगर, किनवट, आदिलाबाद आणि पिंपळकुट्टी मार्गे २० ऑक्टोबर रोजी सकाळी १०.२५ वाजता नागपूर येथे पोहोचेल. या गाडीला एकूण १६ डबे असतील. या गाडीची एक फेरी होणार आहे. गाडी क्रमांक ०७०८६ नागपूर - नांदेड विशेष २० ऑक्टोबर मंगळवार रोजी नागपूर येथून रात्री २३.५५ वाजता सुटेल. पिंपळकुट्टी, आदिलाबाद, किनवट, हिमायतनगर, भोकर आणि मुदखेड मार्गे २१ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.०० वाजता नांदेड येथे पोहोचेल. या गाडीला एकूण १६ डबे असतील.

थोडक्यात

## महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या अध्यक्षपदी अंकुश आहेर

**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या अध्यक्षपदी हिंगोली येथील भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष अंकुश आहेर यांची बिनविरोध विरोध निवड करण्यात आली आहे. या महत्वपूर्ण निवडीमुळे महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रात भारतीय जनता पक्षाने आपली पकड अधिक मजबूत केल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू असून, संपूर्ण राज्यातुनअंकुश आहेर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. बाजार समिती संघाच्या पुणे येथील मुख्यालयात पिठासीन अधिकारी मोहन निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली ही विशेष बैठक पार पडली. आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी अटकेत असलेले संघाचे तत्कालीन अध्यक्ष प्रवीण कुमार नाहटा यांच्या विरोधातनुकताच अविश्वास ठराव एकमताने मंजूर करण्यात आला होता. त्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर अध्यक्षपदासाठी संघाचे अंकुश आहेर यांच्या नावाची निवड करण्यात आली.

आहेर सुचक संतोष सोमवंशी होते तर अनुमोदक म्हणून माजी आमदार तथा संचालक केशवराव मानकर यांनी केले. या निवडीसाठी जेष्ठ संचालक माजी आमदार जयवंत जगताप आणि माजी आमदार केशवराव मानकर यांनी आग्रही भूमिका घेत बाजार समिती संघाच्या अध्यक्षपदासाठी भाजपचा अध्यक्ष बनविण्यात मोलाची कामगिरी केली. या बैठकीत माजी आमदार केशवराव मानकर, जयवंत जगताप,उपसभापती संतोष सोमवंशी, संचालक मनीष दळवी, अशोक डख, सेवकराम ताथोड, दिनेश चोखरे, बाबाराव पाटील, पंडरीनाथ थोरे, सारिका हारगुडे, रंजना कांडेलकर, अनिल गावड, दामोदर नवपुते, संजय कामनापुरे, संदीप काळे, विजय खवास, पोपटराव सोनवणे, नाना उर्फ ज्ञानेश्वर नागमोते व रमेश शिंदे यांच्यासह सर्व कार्यकारीणी संचालक उपस्थित होते. आभार प्रदर्शन कार्यकारी संचालक किशोर कुलकर्णी यांनी केले.

## महिला शेतकरी प्रमाणपत्रामुळे महिलांना शासकीय योजनांचा लाभ सुलभरित्या मिळणार : संचालक आशा पठाण

### महिला शेतकरी सक्षमीकरणासाठी प्रादेशिक कार्यशाळेत मार्गदर्शन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महिला शेतकऱ्यांना मिळणाऱ्या प्रमाणपत्रामुळे त्यांची अधिकृत ओळख निर्माण होणार असून विविध शासकीय योजनांचा लाभ त्यांना सुलभरित्या घेता येईल. या माध्यमातून कृषी उत्पादन, पोषण सुरक्षा आणि शाश्वत शेतीमध्ये सकारात्मक सुधारणा घडून येण्यास मदत होईल, असे प्रतिपादन वनामतीच्या संचालक आशा पठाण यांनी केले. आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष २०२६ व महिला किसान दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने वनामती येथे प्रादेशिक कार्यशाळा व कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे उद्घाटन वनामतीच्या संचालिका आशा पठाण यांनी केले. त्यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यशाळेत महिला शेतकऱ्यांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण साधण्याचा संकल्प उपस्थितांनी केला. विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाडगे, 'आत्मा'चे प्रकल्प संचालक तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. अर्चना कडू, 'आत्मा'च्या प्रकल्प उपसंचालक पल्लवी तलमले, पोषण तज्ज्ञ डॉ रेणुका मायंदे, कृषी शास्त्रज्ञ डॉ. सरिता मोवाडे, प्रगतिशील महिला शेतकरी सुनिता वाधवा यावेळी उपस्थित होते. उमेश घाडगे यांनी महिला शेतकऱ्यांनी कुक्कुटपालन, रेशीम उद्योग आणि कृषी प्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून उत्पन्नाचे स्त्रोत वाढवण्याचे प्रयत्न करण्यासाठी मार्गदर्शन केले.

डॉ. रेणुका मायंदे यांनी महिलांचे आरोग्य, रक्तक्षय प्रतिबंध व स्थानिक पौष्टिक अन्नघटकांच्या वापराबाबत मार्गदर्शन केले. कृषी शास्त्रज्ञ डॉ. सरिता मोवाडे यांनी जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी सेंद्रिय कर्ब वाढविणे, जैविक निविष्ठांचा वापर आणि पीक फेरपालटीचे महत्त्व सांगितले. प्रास्ताविकात डॉ. अर्चना कडू यांनी सेंद्रिय व नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासोबतच महिला शेतकऱ्यांच्या उत्पादनांचे ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि थेट बाजारपेठेशी जोडणी करण्यासाठी आत्मा यंत्रणा प्रयत्नशील असल्याचे सांगितले. प्रगतिशील महिला शेतकरी सुनीता वाधवा यांनी नैसर्गिक शेती व शेतमाल प्रक्रिया उद्योगातील आपले अनुभव कथन केले.

नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांमधील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रगतिशील महिला शेतकऱ्यांचा सन्मान यावेळी करण्यात आला. कार्यक्रमात महिला बचत गटांनी तयार केलेल्या सेंद्रिय उत्पादनांचे, हस्तकलेचे आणि प्रक्रियायुक्त पदार्थांचे प्रदर्शन व विक्री स्टॉल्स हे विशेष आकर्षण ठरले. कार्यक्रमास कृषी विभागाचे अधिकारी व महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तंत्र अधिकारी शुभांगी कामडी यांनी केले व आभार वैशाली पाटील यांनी मानले.

## लॉजवर संशंयास्पद मृत्यू

**अलिबाग :** अलिबागमध्ये एक विचित्र प्रकार समोर आला असून फिरायला आलेल्या २५ वर्षीय तरुणाचा आकस्मिक मृत्यू झाला आहे. या तरुणाच्या मृत्यूनंतर एका महिला डॉक्टरने घेतलेल्या निर्णयामुळे सदर प्रकरणाचं गूढ अधिकच वाढलं आहे. विशेष म्हणजे मयत तरुण हा त्याच्या होणाऱ्या पत्नीसोबत लॉजवर मुक्कामी थांबलेला असतानाच त्याचा अचानक मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, अलिबागमध्ये पर्यटनासाठी अलिबागमध्ये आलेल्या या २५ वर्षीय तरुणाचा वरसोली येथील एका लॉजवर संशयास्पद मृत्यू झाला.

हा सारा प्रकार बुधवारी, १४ ऑक्टोबर रोजी घडला. या प्रकारानंतर, कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न करताच मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आल्याचं समोर आलं आहे. त्यामुळेच या प्रकरणामध्ये जिल्हा रुग्णालयातील एका महिला डॉक्टरच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. याप्रकरणी अलिबाग पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पोलिसांनी प्रकरणाचा तपास सुरु केला आहे.

# महावितरणची भरारी! २० व्या राष्ट्रीय ऊर्जा परिषदेमध्ये तब्बल ७ पुरस्कारांनी सन्मान

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, हरित ऊर्जेला दिलेले प्राधान्य आणि वाढत्या विजेच्या मागणीसह भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी केलेल्या धोरणात्मक बदलांमुळे महावितरणला देशातील भविष्यवेधी डिस्कॉम या मुख्य श्रेणीमध्ये राष्ट्रीयस्तरावर प्रथम क्रमांक मिळाला आहे. यासह तब्बल ७ पुरस्कार पटकावत महावितरणने नवी दिल्ली येथे आयोजित २० व्या राष्ट्रीय ऊर्जा परिषदेमध्ये उत्कृष्ट कामगिरीची मोहोर उमटवली. महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी बुधवारी (दि. १४) हे सर्व पुरस्कार स्वीकारले. इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने मुख्यत्वे वीज वितरण कंपन्यांच्या सक्षमीकरणावर सर्वाधिक भर देणाऱ्या २० व्या राष्ट्रीय ऊर्जा परिषदेचे दि. १३ व १४ ऑक्टोबरला आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत महावितरणने हरित ऊर्जा, कामगिरीत सुधारणा या श्रेणीत प्रथम स्थान पटकावले. तर सेवांची गुणवत्ता व ग्राहक सक्षमीकरण मध्ये द्वितीय तर कार्यक्षम कामकाज आणि तंत्रज्ञानाचा अवलंब या श्रेणींमध्ये देशात तिसरे स्थान मिळवले. या पुरस्कारांसह प्रभावशाली नवकल्पनेसाठी महावितरणचा सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव अनिल राजदान यांच्याहस्ते विशेष सन्मान करण्यात आला.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात आणि अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या नेतृत्वात राज्याच्या वीज क्षेत्रात आमुलाग्र सुधारणा सुरू आहेत. वीजक्षेत्रात देशामध्ये प्रथमच महाराष्ट्राने तयार केलेल्या रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅनचे अनेकविध फायदे समोर येत आहेत. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने स्मार्ट मीटरिंग, हरित ऊर्जेचा वापर, ग्राहक सेवा आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब आणि कंपनीचे आर्थिक सक्षमीकरण आदींमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

राज्याच्या रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅनद्वारे ३८ हजार मेगावॅटपेक्षा अधिक हरित उर्जेची भर पडणार असल्याने २०३० पर्यंत महावितरणचा हरित ऊर्जेचा वाटा १३ टक्क्यांवरून थेट ५२ टक्क्यांपर्यंत वाढणार आहे. हरित ऊर्जेमुळे २०२५ ते २०३० या काळासाठी बहुवार्षिक वीजदरात २६ टक्क्यांपर्यंत कपात जाहीर झाली आहे आणि वीजदर कमी करणारी महावितरण ही देशातील पहिली सरकारी कंपनी ठरली आहे.

यासोबतच 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' अंतर्गत १६ हजार मेगावॅट विकेंद्रित सौर क्षमतेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून दिली जात आहे. आतापर्यंत ६ हजार ६०० मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प कार्यान्वित झाले असून राज्यातील १८ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा सुरू झाला आहे. तसेच 'मागेल त्याला सौर पंप योजने'अंतर्गत देशभरातील एकूण सौर पंपांपैकी तब्बल ६५ टक्के वाटा उचलत ११ लाख ८६ हजार ऑफ-ग्रिड सौर पंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. तसेच 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजने'अंतर्गत आतापर्यंत राज्यात ३ हजार ११५ मेगावॅट क्षमतेचे १३ लाख १२ हजार घरांवर सौर प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. यासह स्मार्ट मीटरिंगमध्ये ५७ टक्के लक्ष्य देखील गाठले आहे.

महावितरणने एआय आधारित लोड फोरकास्टिंग आणि ॲनालिटिक्स प्रणालीचा वापर करून वीज खरेदीमध्ये सुमारे १२०० कोटींहून अधिक रकमेची बचत केली आहे. यासोबतच वीजग्राहकांच्या सुरक्षेसाठी आधार कार्डवर आधारित 'ओटीपी' पडताळणी प्रणाली सुरू करणारी महावितरण देशातील पहिली कंपनी ठरली आहे.

नवीन वीज कनेक्शन, लोड बदलणे आणि बिलावरील नाव बदलणे या सेवांच्या ऑनलाईन अर्जांना 'स्वयंचलित' मंजुरी देण्यात येत आहे. तसेच वीजहानी कमी करण्यासाठी राज्यात धडक मोहीम राबवून एप्रिल ते सप्टेंबरपर्यंत १३३ कोटी ३२ लाख रुपयांच्या वीजचोऱ्या उघड केल्या असून त्यापैकी ६५ कोटी ५६ लाख रुपयांची वसूली करण्यात आली आहे. यासह अनेक उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत या शिखर परिषदेमध्ये तब्बल ७ पुरस्कारांनी महावितरणला गौरविण्यात आले.

## सालेकसा ग्रामीण रुग्णालयात ३०० रुग्णांनी घेतला आयुष आरोग्य शिबीराचा लाभ

### विशेष पाहुण्यांच्या हस्ते झाले आरोग्य शिबिराचे उद्घाटन

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा**

जिल्हा चिकित्सक कुवर तिलकसिंह सामान्य रुग्णालय गोंदियाद्वारा आयोजित एकदिवसीय निशुल्क आरोग्य शिबिराचा आयोजन करण्यात आला होता. सदर शिबिराचे मार्गदर्शक जिल्हा चिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले, वैद्यकीय अधिकारी डी. बी जयस्वाल विशेष अतिथी म्हणून डॉ. ए. के घोरमारे वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय सालेकसा, डॉ. शातनु उईके तालुका पत्रकार संघटनेचे माजी अध्यक्ष व विद्यमान कोषाध्यक्ष यशवंतराव शेंडे, प्रमुख अतिथी वैद्यकीय अधिकारी पिढेकर डॉ. नवरान



गायधने, डॉ. राजेश चुटे आयुष फार्मसी अधिकारी बबीता शिवणकर, नीलिमा कुथे डॉ. स्वर्णरेखा उपाध्याय यांच्यासह सामान्य केटीएस रुग्णालयाचे डॉक्टर व सालेकसा ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर त्रिपाठी व इतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. प्रस्तावना जिल्हा आयुष अधिकारी डॉ. मीनाभट्टी यांनी केले. सूत्रसंचालन डॉक्टर बघेले आभार प्रदर्शन डॉ. त्रिपाठी यांनी मानले. कार्यक्रमाच्या पूर्व तयारी करिता फार्मसी अधिकारी औषधी निर्माता बडे नितेश वाघाडे, अमन दीक्षित, ग्यारीसराम बहेकार, राकेश रगडे, अरविंद उके, कमलेश चापले यांनी केले.

# सामाजिक कार्याला धार्मिक व राजकीय वळण देणे ही काँग्रेसची जुनी परंपरा

### जि.प.सदस्य सविताताई पुराम, विरोधी पक्षावर सविताताई पुराम यांच्या घणाघाती विरोध झुगारून कन्या पूजन

**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

हिंदू संस्कृतीतील नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून आम्ही संपूर्ण जिल्ह्यात ५००० विद्यार्थिनींचे कन्या पूजन व शैक्षणिक साहित्य वाटपाचा पवित्र सामाजिक उपक्रम विश्व मांगल्य सभाच्यावतीने संपूर्ण गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेमध्ये राबवीत आहोत. मात्र नेहमीप्रमाणेच कोणत्याही सामाजिक कायार्ला नको ते धार्मिक आणि राजकीय वळण देणे ही काँग्रेसची जुनीच परंपरा राहिलेली आहे.

विरोधकांनी कितीही केविलवाना प्रयत्न केला किंवा प्रशासनाकडे तक्रारी केल्या तरी आमचे हे पवित्र कार्य थांबणार नाही असा घनाघाती आरोप जिल्हा परिषद सदस्य सविता पुराम पंचायत समिती सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत केला.



या पत्रकार परिषदेला जिल्हा परिषद सदस्य महारवाडे, जिल्हा परिषद सदस्य हनुमंत वटी, पंचायत समिती सभापती योगिनीताई पुंड, उपसभापती सुनंदाताई उके, अंजू बिसेन प्रामुख्याने उपस्थित होते. नवरात्रीनिमित्त आयोजित कन्या पूजन कार्यक्रमाला काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षाकडून होत असलेल्या विरोधाचा त्यांनी अत्यंत कठोर शब्दात समाचार घेतला.

विरोधी पक्षाच्या मानसिकतेवर टीका करताना सविताताई पुढे म्हणाल्या की विश्व मांगल्ये सभा ही संस्कार, सामर्थ्य, सदाचार आणि सेवा याची शिकवण देते. ही शिकवण लहानपणापासून बाल्यावस्थेतच रुजू व्हावी यासाठी चिमुकल्या मुलीचे पूजन करून त्यांना शैक्षणिक व उपयुक्त साहित्याचे वाटप केले जात आहे. ज्याप्रमाणे नवरात्रीत कन्या भोजनाची पवित्र परंपरा आहे. त्याच भावनेने हा सामाजिक उपक्रम सुरू आहे. यात कोणताही राजकीय हेतू नाही. परंतु विरोधी पक्षाला यामध्येही राजकारण दिसत आहे.

विरोधी पक्षांनी शालेय स्तरावर होणाऱ्या या सामाजिक कार्यक्रमावर आक्षेप घेत शिक्षण विभागाकडे तक्रार केली. त्यावर शिक्षण विभागाने पूर्व परवानगी शिवाय शाळांमध्ये कार्यक्रम घेऊ नयेत असा आदेश काढला आहे. यावर बोलताना पुराम ने स्पष्ट केले की प्रशासनाने त्यांचे काम करावे. आम्ही नियमाचे पालन करू. परंतु विरोधकाच्या दबावामुळे हा उपक्रम थांबणार नाही.

१७ ऑक्टोबर पर्यंत हा उपक्रम सुरूच राहणार. १२ ऑक्टोबर पासून सुरू झालेला हा सामाजिक उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात नियोजित वेळापत्रकानुसार अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे पार पडेल असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. मी माझे समाज कार्य यापुढेही असेच सुरू ठेवणार अशी चपकार त्यांनी विरोधकांना यावेळी लावली.

## कामठी येथे श्री सत्य साई प्रेम वाहिनी रथयात्रेचे स्वागत



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

श्री सत्य साई सेवा संघटना नागपूर जिल्हाच्या वतीने काढण्यात आलेल्या श्री सत्य साई प्रेम वाहिनी रथ यात्रेचे येरखेडा- कामठी येथे भव्य स्वागत करून प्रसादाचे वितरण करण्यात आले. येरखेडा येथे प्रवेशद्वारावर ज्येष्ठ मार्गदर्शक गणेश महादेवराव कठाणे यांचे हस्ते श्री सत्य साई बाबांच्या प्रतिमेची पूजा-आरती करून रथयात्रेचे स्वागत करण्यात आले. ढोल,ताशे व विविध भजन मंडळाच्या उपस्थितीत निघालेली रथयात्रा तेलीपुरा, दुर्गा चौक, शिवपंचायत मंदिर,भोयर लेआउट, झेंडा चौक,तारा माता चौक,मरार टोळी, भूषण नगर,सिंधी लाईन, जयस्तंभ चौक,गोयल चौक,सत्यनारायण चौक,नेताजी चौक,मेन रोड ,मोटर स्टँड चौक ,घोरपड रोड देवी मंदिर,गोशाळा नवीन कामठी नगर भ्रमण करीत अजनी कडे रवाना झाली रथ यात्रेचे ठीक ठिकाणी नागरिकांनी स्वागत करून प्रसादाचे वितरण केले.

यावेळी नगराध्यक्ष अजय अग्रवाल,येरखेडा नगरपंचायत चे अध्यक्ष राजकिरण बर्वे,उपाध्यक्ष रंजना काळे, नगरसेवक सुशांत सलाम, प्रशांत काळे,राकेश काळे,सचिन राऊत,सुदाम राखडे,सुषमा राखडे, वंदना वाजुरकर,सुरेंद्र वाजूरकर,अर्चना गभने,रजनी कारेमोरे,अशोक कारेमोरे,शीला देशमुख,यश रेड्डी, मेघा गिरे,हर्षा रोकडे,ललित गभने,स्वाती रहमतकर, अयोध्या राठोड,सुधाकर राठोड,सुषमा हेलोंढे,अमित ठाकूर, सह मोठ्या संख्येने गणमान्य नागरिक उपस्थित होते.

# 'पाणी अडवा, पाणी जिरवा'! ग्रामपंचायत अधिकारी युनियनचा जलसंधारणासाठी पुढाकार

**ग्रामपंचायत दतोरा येथे वनराई बंधाऱ्याचे बांधकाम, वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांचे श्रमदान**

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी, भूजलपातळीत वाढ करण्यासाठी आणि नैसर्गिक जलस्त्रोतांचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने ग्रामपंचायत अधिकारी युनियन, जिल्हा शाखा गोंदिया आणि ग्रामपंचायत दतोरा यांच्या संयुक्त विद्यमाने दतोरा येथे वनराई बंधारा बांधण्याचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी श्रमदान करून जलसंधारणाचा संदेश दिला.

या उपक्रमात जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तानाजी लोखंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी फणिंद्र कुत्तीरकर, मधुकर वासनिक (पंचायत), कीर्तीकुमार कटरे (महिला व बालकल्याण), विजय लोंढे (पाणीपुरवठा व स्वच्छता), सहायक गटविकास अधिकारी वैशाली खोब्रागडे आणि ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.




यावेळी तानाजी लोखंडे यांनी पावसाचे पाणी अडवून त्याचा योग्य विनियोग करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. फणिंद्र कुत्तीरकर यांनी लोकसहभागातून जलसंधारणाची चळवळ उभी करण्याचे आवाहन केले. तसेच पाण्याचा काटकसरीने वापर, जलस्त्रोतांचे संवर्धन आणि पावसाचे पाणी जमिनीत जिरविण्याचे महत्त्व मान्यवरांनी अधोरेखित केले.

ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन यांनी सांगितले की, ग्रामपंचायत अधिकारी केवळ प्रशासकीय कामकाजापुरते मर्यादित नसून ग्रामविकास आणि सामाजिक परिवर्तनातही महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. पूर्वी तलावांच्या माध्यमातून पाणी साठवून जमिनीत जिरविण्याची व्यवस्था असल्याने जिल्ह्यात भूजल उपलब्धतेला मदत झाली. मात्र, जलस्त्रोतांचे संवर्धन केले नाही, तर भविष्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे सामाजिक बांधिलकीतून जलसंधारणाचे उपक्रम राबविणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या उपक्रमात कुलदीप कापगते, सुरेश निमजे, चुन्नीलाल गावलं, लक्ष्मीकांत चिंधालोरे, मयंक माधवाणी, वाय. एच. बिसेन, आर. आर. जमईवार, ओ. के. रहांगडाले, दीपक रेवतकर यांच्यासह जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

वनराई बंधाऱ्याच्या बांधकामातून पावसाचे पाणी अडविणे, जमिनीत मुरविणे आणि भूजलपातळी वाढविण्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचा संदेश देण्यात आला. ग्रामपंचायत अधिकारी युनियन गोंदिया आणि ग्रामपंचायत दतोरा यांच्या या उपक्रमातून श्रमदान, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण झाला. ग्रामीण भागात जलसंधारणाची चळवळ अधिक व्यापक करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

# कालरात्री देवीचा 'आत्मपरिक्षणाचा संदेश' !

शशिकांत तोटे
दारव्हा, जि.यवतमाळ

आज शारदीय नवरात्रोत्सवाचा सातवा दिवस अर्थात महासप्तमी. या दिवशी नवदुर्गेची सातवी शक्ती कालरात्री देवीची पूजा केली जाते. शुंभ-निशुंभ आणि रक्तबीज राक्षसांचा वध करण्यासाठी माता दुर्गेला कालरात्रीचे रूप धारण करावे लागले होते, असे पुराणानुसार सांगितले जाते. काल रात्रीदेवीचे स्वरूप अंधारासारखे काळे आहे. तिच्या श्वासातून अग्नी निघतो. तिच्या गळ्यात विद्युत चमक असलेल्या माळा आहेत. देवीचे केस मोठे आणि विखुरलेले आहे. देवीला तीन डोळे आहे,ज्याद्वारे वीजेसारखे किरण बाहेर पडतात. ती चतुर्भुज असून एका हातात तलवार, दुसऱ्या हातात लोखंडी शस्त्र, तिसऱ्या हातात भक्तांसाठी वरमुद्रा आणि चौथा हाताने अभयमुद्रा प्रदान करते. देवीचे हे रूप विक्राळ आहे. दुष्टांना भय, तर मोठ्या डोळ्यांवरे भक्तांकडे करुणेच्या नजरेने पाहते. ती दिसायला भयंकर असली तरी ती सज्जनाचे नेहमी कल्याण करते. त्यामुळे तिला 'शुभंकर' असे म्हटले जाते. ती ब्रम्हांडातील नकारात्मक ऊर्जा व भय सुद्धा नष्ट करते.

कालरात्री चा अर्थ काळ, म्हणजे अंधार, मृत्यू, संकट आणि अंधः कारावर नायनाट करणारी असी कालरात्री देवी आहे. त्यामुळे कालरात्री देवीची उपासना केवळ धार्मिक विधीवर विधी व उत्सवापूर्ती मर्यादित नाही, तर ती सामाजिक जीवनात महत्त्वपूर्ण संदेश देते. तिच्या स्वरूपातील व्यापक अर्थांपैकी एक, जीवनात कितीही संकटे आली तरी धैर्य आणि आत्मविश्वासाच्या बळावर त्यांचा सामना करता येते. आज समाजात चहुदिशेने भिन्नभिन्न प्रकारच्या सामाजिक समस्या आ वासून उभ्या आहेत. त्या समाजाच्या प्रगतीसमोर मोठे आव्हान निर्माण करतात. अशा परिस्थितीत कालरात्री देवीचे स्मरण म्हणजे अन्याया समोर न झुकण्याचा आणि चुकीच्या गोष्टींविरुद्ध ठामपणे उभे राहण्याची प्रेरणा देते. देवीच्या नऊ रूपाची नऊ दिवस पूजा उपासना करून चालणार नाही, तर तिच्या प्रतिकातून समाजाला संदेश सुद्धा मिळतो. तिचे शौर्य, निर्भयता, करूणेचा आदर्श आपल्या आचरणात उतरवणे आजच्या काळाची गरज बनली आहे.



नवरात्रातील कालरात्री देवीचे रूप केवळ दृष्ट शक्तीचा नाश करणारे प्रतीक ठरत नसून,तर मानवी मनातील अंधःकार ओळखून तो दूर करण्याची प्रेरणा ही देणारे आहे. समाजातील अनंत समस्या केवळ बाह्य परिस्थितीमुळे निर्माण होत नाही.तर माणसाच्या मनातील स्वार्थ, अहंकार, द्वेष, मत्सर आणि असंवेदनशिलता सारख्या प्रश्नांनी कारणीभूत ठरतात. दुसऱ्याच्या दुःखाकडे दुर्लक्ष करणे, स्वतःच्या फायद्यासाठी इतरांचे नुकसान करणे, चूक दिसत असूनही त्याकडे डोळेझाक करणे हा मानसिक अंधकारच आहे. कालरात्री देवीच्या प्रतीकात्मक अथार्चा विचार करताना या प्रवृत्तींवर विजय मिळवण्याची गरज अधोरेखित होते. आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवी जीवन अधिक गतिमान झाले आहे.मात्र या प्रगतीच्या प्रवासात माणसामाणसातील सुसंवाद, जिव्हाळा, परस्परा विषयीची संवेदनशीलता कमी होत झाल्याचे चित्र अनेकदा पाहायला मिळते. सोशल मीडियावरील आभासी जवळीक वाढत असताना, प्रत्यक्ष जीवनातील नात्यांमध्ये दुरावा निर्माण होतो. दुसऱ्याच्या यशा त आनंद न मानण्या ऐवजी त्याच्याशी स्पर्धा करतो. अफवांची खातरजमा न करता त्या पसरविणे आणि मतभेदांचे रूपांतर मनभेदांत करणे या प्रवृत्ती समाजास बाधा आणतात. अशावेळी स्वतःच्या विचारां चे आणि वर्तनाचे आत्मपरीक्षण करणे आवश्यक ठरते.

नवरात्र उत्सवाच्या पावन पर्वात कालरात्री देवीची उपासना करतांना चिंतनही आवश्यक ठरते. आपल्या जीवनाचा जो मूलाधार आहे, त्या पर्यावरणीविषयीची जबाबदारी अधोरेखित करता येते. नैसर्गिक साधन संपत्तीचे अमर्याद शोषण, वृक्षतोड, पाण्याचा अपव्यय,जल, वायु ध्वनी, भू प्रदूषण ही समस्या जागतिक झालेली आहे. देवीने सृष्टी निर्माण केली. त्याच सृष्टीतील सामुग्री चा गरजेपेक्षा अधिक वापर करून शोषण करीत आहोत.

आज निसर्गाकडे केवळ उपभोगाची वस्तू म्हणून पाहण्याची वृत्ती अधिक बोकाळली आहे. ती बदलणे गरजेचे आहे. निसर्गरक्षण, पाणी बचत, वृक्ष संवर्धन, तंत्रज्ञानाचा मर्यादित वापर व खनिज संपत्तीच्या अनाठायी वापरांवर स्वतःहून बंधने व नियंत्रण ठेवणे अत्याश्यक ठरते. उत्सवाच्या नावाखाली उन्मादी वृत्ती नसावी.आपल्या उत्सवाचा आदर्श इतरांनी घेऊन प्रेरित व आकर्षित होईल अशी कृती करणे अपेक्षित आहे.

याशिवाय आजच्या काळात वाढत असलेली असहिष्णुता घरापासून,तर समाजापर्यंत अभावानेच सापडते. भिन्नभिन्न विचार करणे, लोकतंत्राची ताकद आहे. परंतु मत भिन्नतेमुळे एकमेकांचा व्देष करणे ही समाजासाठी धोकादायक बाब आहे. इतरांच्या मतांचा आदर करून वादा ऐवजी संवादातून मार्ग काढणे हे सदृढ समाजाची लक्षणे आहेत. कालरात्री देवीचा संदेश केवळ केवळ वाईट शक्तींशी लढण्यापुरता मर्यादित न ठेवता स्वतःमधील नकारात्मकता ओळखून तिच्यावर विजय मिळविण्याशी जोडता येते. कारण समाज परिवर्तनाची सुरुवात प्रत्येक व्यक्तीच्या विचारातून आणि आचरणातून होते. मनातील स्वार्था ऐवजी सहकार्य व्देषा ऐवजी सहिष्णुता आणि उदासीनते ऐवजी संवेदनशीलता स्वीकारली, तर सामाजिक जीवन सुंदर होऊ शकते.

**मो.९१३०८३५४५८**

# महिला उद्योजिका : स्वकर्तृत्वाने घडविणारी यशस्वी स्त्री

**नवरात्र उत्सव विशेष - सातवी कर्तृत्ववान स्त्री**




सौ. माधुरी धनोकार,
अकोला

महिला उद्योजिका ही केवळ व्यवसाय करणारी स्त्री नसून, ती स्वतःच्या स्वप्नांना बळ देणारी, कुटुंबाला आर्थिक आधार देणारी आणि समाजाला प्रगतीची दिशा दाखवणारी एक प्रेरणादायी शक्ती आहे. आपल्या बुद्धिमत्तेने, मेहनतीने, जिद्दीने आणि आत्मविश्वासाने ती यशाची नवी शिखरे गाठत आहे.

पूर्वी महिलांची ओळख प्रामुख्याने घर सांभाळणारी स्त्री अशी होती; परंतु आजची महिला घराची जबाबदारी सांभाळतानाच उद्योग-व्यवसायाच्या क्षेत्रातही आपला ठसा उमटवत आहे. पापड, लोणची, मसाले, शिवणकाम, ब्युटी पार्लर, हस्तकला, खाद्यपदार्थ निर्मिती, शेतीपूरक व्यवसाय, ऑनलाइन व्यवसाय अशा विविध क्षेत्रांत महिला यशस्वी होत आहेत. अनेक महिला लघुउद्योग सुरू करून इतर महिलांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत आहेत.

महिला उद्योजिकेचा प्रवास नेहमीच सोपा नसतो. भांडवलाची कमतरता, कौटुंबिक जबाबदाऱ्या, बाजारपेठेतील स्पर्धा आणि सामाजिक अडचणी यांचा सामना करताना तिला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. मात्र, तिच्या मनातील जिद्द आणि काहीतरी वेगळे करून दाखविण्याची इच्छा तिला पुढे जाण्याचे बळ देते. आज महिला बचत गट, शासकीय योजना, कौशल्य विकास प्रशिक्षण आणि डिजिटल माध्यमांच्या मदतीने अनेक महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहत आहेत. आर्थिक स्वावलंबनामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो, कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढतो आणि समाजात त्यांना सन्मानाचे स्थान मिळते.

महिला उद्योजिका ही महिला सक्षमीकरणाचे जिवंत उदाहरण आहे. तिचे यश केवळ तिचे वैयक्तिक यश नसते, तर ते इतर अनेक महिलांसाठी प्रेरणेचा दीप ठरते. प्रत्येक महिलेने स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून संधींचा शोध घ्यावा आणि स्वप्नांना कृतीची जोड द्यावी.

कारण, स्त्री जेव्हा स्वतःच्या पायावर उभी राहते, तेव्हा ती केवळ स्वतःचे आयुष्य बदलत नाही, तर संपूर्ण कुटुंबाच्या आणि समाजाच्या प्रगतीचा मार्गही उजळवते.

**महिला उद्योजिकेवरील चारोळी**

जिद्दीच्या बळावर स्वप्नांना आकार देते, कष्टांच्या वाटेवर यशाचे फूल फुलविते; स्वकर्तृत्वाने ती नवी ओळख घडविते, महिला उद्योजिका बनून जगाला प्रेरणा देते !

# न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे काळी फीत लावून आंदोलन

**परभणी :** उच न्यायालय, मुंबई यांनी मा. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे सर्व दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही 'समान काम समान वेतन' या तत्वानुसार सुधारीत वेतनवाढीचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास मंजुरीस्तव पाठविण्यात आला आहे. जवळपास २० महिण्यापेक्षा जास्त कालावधी होवूनही सदर सुधारीत वेतनवाढ प्रस्ताव शासनाकडे प्रलंबीत असून याकडे महाराष्ट्र शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन लघुलेखक संघटना शाखा परभणी, परभणी जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटना गट-क, परभणी जिल्हा बेलीफ संघटना, परभणी जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटना गट-ड, या चारही संघटनांचे सर्व न्यायालयीन कर्मचारी हे आज दिनांक १६ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी परिसरात काळ्या फिती लावून शांततेच्या मार्गाने कार्यालयीन कामकाज करत आंदोलन करत असून उद्याही याचप्रकारे आंदोलन करण्यात येणार आहे. मागण्या मान्य न झाल्यास दिवाळी साजरी न करण्याचा निर्धार न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला.

# गरिबीचा शाप : विकासाच्या दाव्यांच्या पार्श्वभूमीवर संघर्षमय जीवन

**(आंतरराष्ट्रीय गरिबी निर्मूलन दिन विशेष)**

डॉ. प्रितम भि. गेडाम
नागपूर

गरिबी ही अत्यंत गंभीर समस्या असून, ती स्वतःसोबत शेकडो समस्यांना जन्म देते आणि जीवनमान तसेच विकासाची गती खिळखिळी करते. सातत्याने वाढणारी आर्थिक विषमता गरिबीमुक्त देश घडविण्याच्या मार्गात अडथळे निर्माण करते. त्यात महागाई, भ्रष्टाचार आणि बेरोजगारी यांची भर पडल्याने गरिबी अधिक गंभीर बनते. प्रत्येक क्षेत्रात राजकीय हस्तक्षेप आणि घराणेशाहीमुळे निर्माण होणारा दबावही विकासाच्या प्रक्रियेत बाधा आणतो. भेसळखोरी, प्रदूषण, काँक्रीटच्या वाढत्या जंगलांमुळे होणारे पर्यावरणीय नुकसान आणि वृक्षतोड यांमुळे जागतिक तापमानवाढीची समस्या अधिक तीव्र होते. परिणामी, नैसर्गिक आपत्ती वाढतात, विविध आजारांचा प्रसार होतो आणि मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. या सर्वांचा सर्वाधिक फटका गरीब वर्गाला सहन करावा लागतो. विविध सरकारी योजनांचा लाभ मिळत असूनही गरीब कुटुंबांना सन्मानजनक जीवनमान गाठण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

जागतिक असमानता अहवाल २०२६ नुसार, देशातील सर्वाधिक उत्पन्न असलेल्या १० टक्के लोकसंख्येकडे राष्ट्रीय उत्पन्नाचा ५८ टक्के हिस्सा आणि राष्ट्रीय संपत्तीचा ६५ टक्के हिस्सा आहे. याउलट, सर्वात खालच्या आर्थिक स्तरातील ५० टक्के लोकसंख्येच्या वाट्याला राष्ट्रीय उत्पन्नातील केवळ १५ टक्के हिस्सा येतो. देशातील सर्वाधिक श्रीमंत एक टक्का लोकांकडे एकूण राष्ट्रीय संपत्तीपैकी जवळपास ४० टक्के संपत्ती आहे. जागतिक आर्थिक मंचाच्या माहितीनुसार, जागतिक लैंगिक अंतर निदेर्शांक २०२६ मध्ये भारत १४५ देशांमध्ये १३१व्या स्थानावर आहे. दरवर्षी १७ ऑक्टोबर रोजी गरिबी निर्मूलनाविषयी जनजागृती करण्यासाठी संपूर्ण जगभरात आंतरराष्ट्रीय गरिबी निर्मूलन दिन साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने २०२६ या वर्षासाठी सर्वांसाठी सुरक्षित घर ही संकल्पना निश्चित केली आहे.

गरिबीमुळे लोकांचा बहुतांश वेळ दोन वेळच्या अन्नाची व्यवस्था करण्यातच खर्च होतो. त्यामुळे त्यांना घर, कुटुंब आणि मुलांसाठी पुरेसा वेळ देता येत नाही. आरोग्य, शिक्षण, भविष्याची सुरक्षितता आणि लोककल्याणकारी योजनांविषयीही त्यांच्यामध्ये पुरेशी जागरूकता नसते. अनेक राजकीय पक्षांनाही निवडणुकीच्या काळातच गरीबांची आठवण होते. त्या वेळी त्यांच्याशी केलेली मोठमोठी आश्वासने कालांतराने विसरली जातात. गरिबीत जन्मलेले मूल स्वतःला गरिबीच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी असंख्य संघर्षांना सामोरे जाते. आपल्या पुढील पिढीला चांगले जीवनमान मिळावे, यासाठी ते प्रयत्नशील असते; मात्र मोजक्याच लोकांना या संघर्षात यश मिळते.

गरिबीमुळे अनेकांना पोटभर अन्न मिळत नाही आणि मिळणाऱ्या अन्नातूनही आवश्यक पोषक घटकांची पूर्तता होत नाही. पिण्यासाठी स्वच्छ पाणी आणि राहण्यासाठी योग्य व पुरेशी जागा उपलब्ध नसते. बदलत्या हवामानाशी जुळवून घेत जीवन जगणेही त्यांच्यासाठी अत्यंत कष्टदायक ठरते. दीर्घकाळ पुरेसे अन्न, पोषक आहार, शुद्ध पाणी आणि स्वच्छ हवा मिळत नसल्यामुळे कुपोषण तसेच गंभीर आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्याची शक्यता वाढते. आजारी पडल्यास उत्तम उपचार, औषधे आणि आरोग्य विम्याची सुविधा परवडत नसल्यामुळे वेळेवर उपचार घेता येत नाहीत. परिणामी, आजार गंभीर होत जातात आणि आयुर्मानावरही विपरीत परिणाम होतो. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे अनेक मुलांना लहान वयातच शाळा सोडावी लागते आणि कुटुंबाला आर्थिक मदत करण्यासाठी काम करावे लागते.

देशातील बेरोजगारीची परिस्थिती सर्वश्रुत आहे. चतुर्थ श्रेणीतील मोजक्या पदांसाठीही लाखो उच्चशिक्षित उमेदवार अर्ज करतात. त्यामध्ये अभियंते, व्यवस्थापनाचे शिक्षण घेतलेले उमेदवार आणि पीएच.डी. पदवीधारकांचाही मोठ्या प्रमाणावर समावेश असतो. या लाखो बेरोजगार तरुणांकडून अर्ज आणि परीक्षा शुल्काच्या माध्यमातून सरकारकडे कोट्यवधी रुपये सुद्धा जमा होतात. वय निघून जाते; परंतु पात्रतेनुसार रोजगार मिळत नाही. शैक्षणिक पात्रता आणि कौशल्यअनुरूप नोकरी किंवा रोजगार मिळवणे अत्यंत कठीण बनले आहे. शिक्षण आणि रोजगार यांमुळेच माणसाला गरिबीतून बाहेर पडण्याची संधी मिळते. एखादी व्यक्ती कठोर परिश्रम करून उच्च शिक्षण घेते आणि नोकरी किंवा रोजगार मिळविण्यासाठी आवश्यक पात्रताही धारण करते; तरीही तिला रोजगारापासून वंचित राहावे लागले, तर तिच्यासह तिच्या संपूर्ण कुटुंबाची स्वप्ने धुळीस मिळतात. नोकरी भरतीतील भ्रष्टाचार, परीक्षांचे पेपर फुटणे आणि राजकीय दबाव यांसंबंधीच्या बातम्याही अनेकदा चर्चेत असतात. अशा परिस्थितीत सामान्य माणसाने गरिबीच्या साखळ्या तोडून बाहेर कसे पडावे, हा गंभीर प्रश्न आहे.

वाढत्या बेरोजगारीमुळे उच्चशिक्षित तरुणांनाही मिळेल ते काम करावे लागते. कौशल्यांचा अभाव आणि संसाधन यांमुळेही बेरोजगारी वाढते. गरिबीमुळे अनेकांना असुरक्षित घरांमध्ये, गर्दीच्या अरुंद गल्ल्यांमध्ये आणि अस्वच्छ परिसरात राहावे लागते. सांडपाण्याच्या अस्वच्छ गटारी, झोपडपट्ट्या, कचऱ्याचे ढीग, अस्वच्छता आणि डास-माशांचा प्रादुर्भाव यांमुळे त्यांचे जीवन अधिक त्रासदायक होते. अनधिकृत वस्त्यांमध्ये राहणाऱ्या किंवा बेघर असलेल्या लोकांना पर्यावरणाशी संबंधित विविध धोक्यांचाही सामना करावा लागतो. अशा दूषित आणि प्रतिकूल वातावरणात आजार, व्यसनाधीनता आणि गुन्हेगारी कारवायांचे प्रमाण वाढण्याची शक्यता असते.

अशा परिस्थितीत राहिल्यामुळे व्यक्तीच्या विचारशक्तीवर आणि मानसिकतेवर गंभीर परिणाम होतो. सतत पैशांच्या कमतरतेचा विचार करावा लागतो. स्वतःच्या इच्छा आणि आकांक्षा बाजूला ठेवून अनेकांना कर्जाच्या ओझ्याखाली जीवन जगावे लागते. सामाजिक बदनामी, कौटुंबिक भांडण, तणाव आणि अस्वस्थता यांमुळे शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्यही बिघडते. गरीबांना अनेकदा सामाजिक आणि जातीय भेदभावाचा सामना करावा लागतो. राजकीय प्रतिनिधित्वाच्या बाबतीतही त्यांचा सहभाग अत्यल्प असतो. जागरूकतेचा अभाव आणि सामाजिक सुरक्षिततेची कमतरता यांमुळे त्यांना गुन्हेगारी किंवा शोषणाचे बळी ठरण्याचा धोका सहन करावा लागतो.

ज्या देशात प्रगत आरोग्यसेवा, गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था आणि पात्रतेनुसार रोजगार उपलब्ध असतो, तसेच या मूलभूत सुविधांसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जात नाही आणि कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान संधी दिली जाते, तो देश प्रगतीच्या मार्गावर असतो. अशी परिस्थिती भारतात निर्माण झाली, तर गरिबीचे समूळ उच्चाटन करणे शक्य होऊ शकते. कारण गरिबीच्या समस्येला सामोरे जाण्यासाठी लोकांना आरोग्य, शिक्षण आणि रोजगार या क्षेत्रांवर सर्वाधिक खर्च करावा लागतो. या तिन्ही सेवा प्रगत दर्जाच्या आणि सर्वांना मोफत उपलब्ध झाल्या, तर प्रत्येक व्यक्ती सक्षम, पात्र, जबाबदार आणि स्वतःचे जीवनमान उंचावण्यासाठी समर्थ होऊ शकते. त्यानंतर जनतेला मोफत धान्य, वीज आणि पाणी पुरविण्यावरील अवलंबित्व कमी होऊ शकेल. गरिबीच्या दुष्टचक्रातून बाहेर पडलेली व्यक्ती स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि आवश्यक खर्च उचलण्यासाठी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकेल.

शिक्षण, आरोग्य आणि रोजगार या मूलभूत सुविधांपर्यंत सहज पोहोच मिळविण्याच्या संघर्षात अनेक पिढ्यांचे आयुष्य खर्ची पडते; तरीही या सुविधा सर्वांपर्यंत सुलभपणे पोहोचत नाहीत. देशातील गरीबांना सामाजिक समरसतेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना सक्षम बनविणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून ते स्वतःच्या विकासाची जबाबदारी घेऊ शकतील. सरकारने भ्रष्टाचारावर कठोर नियंत्रण ठेवून आरोग्यसेवा, शिक्षण आणि रोजगार या क्षेत्रांसाठी सर्वाधिक अर्थसंकल्पीय तरतूद करावी. प्रत्येक हाताला कौशल्य आणि पात्रतेनुसार काम मिळाले पाहिजे. पैशांच्या अभावामुळे उपचार घेता न आल्याने कोणत्याही गरीब व्यक्तीचा मृत्यू होऊ नये. एकही गरीब शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ येवू नये. कोणत्याही मुलाचे पैश्याअभावी शिक्षण बंद होऊ नये. प्रत्येकाला सुरक्षित वातावरण, पोषक आहार, स्वच्छ पाणी आणि शुद्ध हवा मिळाली पाहिजे. देशात केवळ योजनांचे लाभार्थी निर्माण करण्याऐवजी सक्षम, स्वावलंबी आणि जबाबदार नागरिक घडविण्यावर भर दिला पाहिजे.

**- (महाराष्ट्र शासनाद्वारे पुरस्कृत लेखक)**
**मो. ०८२३७४१७०४१**